cmyk

## संपादकीय

### हा शैक्षणिक खेळ जिवघेणा ठरतोय !

देशात कोणतीही मोठी दुर्घटना घडली की लोक जागे होतात. आंदोलन किंवा निषेधाचे सूर उमटू लागतात. चौकशी समित्यांची नियुक्ती केली जाते. दोषींना कठोर शिक्षा केली जाईल, असे छापील वाक्य ठोकून सरकारही मोकळे होते. थोड्याच दिवसांत या सगळ्यावर पाणी पडते. त्यात मृत्युमुखी पडलेले आणि ती घटनाच नेमकी कशामुळे घडली यांनाही त्यांच्याच मरणाने मरणासाठी सोडून दिले जाते. लोकांचे जीवन तसेच पुढे सुरू राहते आणि चमकणारे चेहरे एक एक करत गायब होतात.

दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

### यूपीएससी उमेदवारांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास सीबीआयकडे

दिल्ली: दिल्लीत जुन्या राजेंद्र नगमधील केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षेची तयारी करणाऱ्या उमेदवारांचा मृत्यू झाला. अभ्यासिकेत अचानक पूराचे पाणी घुसल्याने यूपीएससीचा अभ्यास करणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना या दुर्घटनेत जीव गमवावा लागला. दरम्यान दिल्ली उच्च न्यायालयाने या प्रकरणाचा तपास शुक्रवारी (दि.२ ऑगस्ट) सीबीआयकडे सोपवला आहे. या प्रकरणाची दखल घेऊन कोचिंग सेंटरचा मालक आणि संयोजकासह अनेकांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. दरम्यान न्यायालयाने या घटनांचे गांभीर्य लक्षात घेत, भ्रष्टाचाराचारात लोकप्रतिनिधींचा संभाव्य सहभाग हे प्रमुख कारण नमूद केले आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१०३ | शनिवार दि.०३ ऑगस्ट २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# सरकार शेतकरी कर्जमाफीच्या तयारीला लागले?

## विधानसभा निवडणुकीच्या आधी घेणार निर्णय, खर्चाचा अंदाज घेण्यास सुरूवात

**पुणे । प्रतिनिधी**

**सत्ताधाऱ्यांना शेतकऱ्यांच्या नाराजीचा चांगलाच फटका बसणार, याची जाणीव आहे. शेतीमाल बाजारभावाचा मुद्दा शेतकऱ्यांच्या अजेंड्यावर दिसतो. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत कोणतीही जोखीम घेण्यास सत्ताधारी तयार नाहीत. शेतकऱ्यांची नाराजी दूर करण्यासाठी सरकार निवडणुकीच्या तोंडावर सर्व ते प्रयत्न करत आहे. त्याचाच एक भाग म्हणजे १४ हजार कोटींची मोफत वीज योजना आणि सव्वाचार हजार कोटींची कापूस, सोयाबीनला हेक्टरी ५ हजार रुपये मदतीची योजना म्हणून सरकारने जाहीर केली. आता कर्जमाफीही विधानसभा निवडणुकीच्या आधी करण्याची अपरिहार्यता सरकारला जाणवू लागली आहे.**



राज्यातील सर्व शेतकरी कर्जमाफीची वाट पाहत आहेत. कर्जमाफीवरून अनेक चर्चाही सुरु आहेत.

### कर्जमाफीवर प्रश्नचिन्ह

दुसऱ्या बाजुला सरकारने आधीच शेतकऱ्यांसाठी काही योजना जाहीर केल्या आहेत. तसेच सरकारची आर्थिक परिस्थिती बिकट बनली आहे, त्यामुळे सरकार कर्जमाफी करणार नाही, अशीही चर्चा सुरु आहे. सरकारने शेतकऱ्यांसाठी मागच्या महीनाभरातच मोफत वीज योजना, कापूस आणि सोयाबीनसाठी हेक्टरी ५ हजार रुपयांची मदत जाहीर केली. त्यातच राज्य सरकारकडे पैसा नाही, हे नुकतेच अर्थमंत्री आणि इतर मंत्र्यांमध्ये रंगलेल्या चर्चेवरून स्पष्ट झाले आहे. याचा आधार घेऊन सरकारच्या कर्जमाफीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहेत.

### भावांतर टाळण्यासाठी कापूस, सोयाबीनला हेक्टरी पाच हजार

पण मुळात भावांतर योजना जाहीर करण्याची वेळच चुकली होती, हे सर्वजण सांगत होते. पण शेतीमालाच्या भावावरून शेतकऱ्यांची वाढेलेली नाराजी दूर करण्यासाठी सरकारने योजना जाहीर केली होती. आता सरकार याविषयी बोलतही नाही. कारण सरकारलाही माहीत आहे भावांतर योजना आता राबवता येणार नाही. पण शेतकरी भावांतरचा पिच्छा सोडत नव्हते म्हणून सरकारने कापूस आणि सोयाबीनला हेक्टरी ५ हजार रुपये जाहीर केले.

पण सरकार आता आचारसंहीता लागू होण्याच्या आधी कर्जमाफी करणार, ही खात्रीशीर माहिती या प्रक्रियेत काम करणाऱ्या सुत्रांनी दिली. तसेच शेतकऱ्यांवर किती कर्ज आहे आणि कर्जमाफीसाठी किती पैसा लागणार? याची माहितीही सरकारने गोळा केली असल्याचेही समोर येत आहे. शेतकऱ्यांची सरकारच्या धोरणावरील नाराजी, लोकसभा निवडणुकीत शेतकऱ्यांनी दिखवलेला इंगा आणि कर्जमाफीवर अडून बसलेले शेतकरी, या तीन कारणांमुळे सरकारला निवडणुकीच्या आधी कर्जमाफी करावी लागणार आहे. विधानसभा निवडणुकीसाठी ◀◀ पान २ वर

# खा.सोनवणे यांनी संसदेत मांडला ऊसतोड कामगारांचा मुद्दा !



## पहिल्याच तडाखेबंद भाषणातून मांडल्या जिल्ह्याच्या समस्या; आरोग्यासाठी विशेष तरतूद करण्याची केली मागणी

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

माझ्या बीड जिल्ह्याला ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी ओळख आहे. याठिकाणी ऊसतोड कामगारांच्या नावावर केवळ राजारकण केले, मात्र त्यांच्यासाठी कुठल्याही सोयीसुविधा आजवर दिल्या नाहीत. त्यांच्यासाठी विशेष तरतूद करा आणि बीड जिल्ह्यात आरोग्य यंत्रणेला उभारी देण्यासाठी विशेष प्रयत्न करा. रिक्त जागा, अत्याधुनिक मशीनरी आणि रूग्णालये मंजूर करा, अशी मागणी खा.बजरंग सानवणे यांनी लोकसभा सभागृहात आपल्या पहिल्याच तडाखेबंद ◀◀ पान २ वर

### मराठीतून भाषण अन् शेतकरी, शरद पवार, जरांगे पाटील यांना नमस्कार...

मराठी ही आपली जन्मभाषा असल्याने मराठीतूनच बोलणार, असे सांगून त्यांनी संपूर्ण भाषण मराठीत केले. यावेळी त्यांनी माझी शेतकरी पुत्र अशी ओळख असून, एक सामान्य शेतकरी पुत्र संसदेत पोहोचला, तो शेतकऱ्यांनी पोहचवला, त्याबद्दल शेतकऱ्यांचे आभार त्यांनी मानले. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना नमस्कार करून त्यांच्या समाजाभिमुख कार्याचे स्मरण करतो, अशी त्यांनी सुरुवात केली.

### लिंग गुणोत्तराला आरोग्य व्यवस्थाही कारणीभूत

बीड जिल्ह्यात लिंग गुणोत्तर १ हजार पुरुषांमागे ९३३ महिला असे आहे. याला वर्षानुवर्षे चालत आलेली आरोग्यव्यवस्था तेवढीच कारणीभूत आहे. या मुद्द्यांसह इतर अनेक मुद्द्यांवर यावेळी आग्रहपूर्वक प्रश्न मांडले.



### निवडणूक रोखे चौकशीसाठीच्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

निवडणूक रोख्यांतील कथिक गैरव्यवहाराची चौकशीची मागणी करणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या आहेत. सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, जे. बी. पारधिवाला, मनोज मिश्रा यांच्या पीठाने शुक्रवारी हा निकाल दिला. फेब्रुवारी २०२४ सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोखे घटनाबाह्य असल्याचा निकाल देऊन ते रद्दबातल ठरवले होते. ◀◀ पान २ वर

### वायनाडमध्ये १०० घरे बांधणार – राहुल गांधी

वायनाड: नुकतेच केरळमधील वायनाड येथे भूस्खलनाची दुर्दैवी घटना घडली. या दुर्दैवी दुर्घटनेत २०० हून अधिक नागरिकांना मृत्यू झाला. तसेच संपूर्ण परिसरात चिखल आणि माती पसरली. या पार्श्वभूमीवर वायनाडचे माजी खासदार तथा काँग्रेस नेते राहुल गांधी आणि प्रियंका गांधी तातडीने यांनी केरळ येथील दुर्घटनाग्रस्त भागाची पाहणी केली. त्यानंतर राहुल गांधी यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना वायनाड येथील दुर्घटनाग्रस्तांसाठी १०० घरे बांधून देणार असल्याचे सांगितले. पुढे बोलताना राहुल गांधी म्हणाले की, केरळमध्ये यावेळच्या वायनाडमधील दुर्घटनेइतकी विनाशकारी घटना एका भागात कधीच घडली नाही. ◀◀ पान २ वर

## तात्काळ पंचनामे करून शेतकरी, नागरिकांना सरसकट आर्थिक मदत करा

### राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**पुणे । पतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्र ओला आणि कोरड्या दुष्काळाचा सामना एकाचवेळी करत असल्याचे दिसून येत आहे. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून, तात्काळ पंचनामे करुन नागरिकांना व शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक



मदत करा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली आहे.

जयंत पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना याबाबत पत्र लिहिले आहे. माहिती देताना जयंत पाटील म्हणाले आहेत की, राज्यात जुलै महिन्यात पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भातील ◀◀ पान २ वर

## चिल्लर लोकांच्या काय फोडता ; शरद पवार, उद्धव ठाकरे, फडणवीसांच्या गाड्या फोडा–प्रकाश आंबेडकर

**परभणी । प्रतिनिधी**

**गाडी तोडफोड प्रकरणावर सध्या राजकीय वातावरण तापले असताना वंचित बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी खळबळजनक वक्तव्य केले आहे. चिल्लर लोकांच्या गाड्या काय फोडताय? शरद पवार, देवेंद्र फडवणीस, उद्धव ठाकरे यांच्या गाड्या फोडा, असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे. ते परभणीतील गंगाखेड येथे बोलत होते.**

प्रकाश आंबेडकर आरक्षण बचाव यात्रेच्या निमित्ताने परभणीत होते. परभणीतून ते शुक्रवारी गंगाखेड येथे गेल्यानंतर तिथे आयोजित जाहीर सभेत त्यांनी अशा प्रकारचे वक्तव्य केले आहे. तसेच जिंतेंद्र आव्हाड आणि अमोल मिटकरी यांना चिल्लर म्हणून देखील संबोधले आहे. जितेंद्र आव्हाड हे शरद पवार गटाचे आणि अमोल मिटकरी हे अजित पवार गटाचे आहेत. या गाड्या फोडणाऱ्यांना माझे आवाहन आहे, अशा चिल्लर ◀◀ पान २ वर



# चक दे इंडिया, भारताचा ऐतिहासिक विजय!

### ऑस्ट्रेलियाचा ५२ वर्षांनंतर ऑलिम्पिकमध्ये पराभव, ४–२ असा दणदणीत विजय

**पॅरिस । वृतसंस्था**

**भारताने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पूल बी च्या शेवटच्या साखळी सामन्यात ऑस्ट्रेलियावर ४–२ असा दणदणीत विजय साकारला. कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि अभिषेक हे या विजयाचे नायक ठरले. दोघांनी कांगारूंच्या बचावफळीला खिंडार पाडत प्रत्येकी दोन–दोन गोल डागले. विशेष म्हणजे ५२ वर्षांनंतर ऑस्ट्रेलियाचा ऑलिम्पिकमध्ये पराभव झाला आहे.**



उपांत्यपूर्व फेरीपूर्वी हरमनप्रीत सिंगचा संघ विजयी मार्गावर परतला आहे. गुरुवारी बेल्जियमने पूल बी मधील सामन्यात भारताचा २–१ ने पराभव केला होता. त्या सामन्याच्या दुसऱ्याच दिवशी म्हणजे शुक्रवारी भारताने कांगारूंच्या तोंडचे पाणी पळवल्याचे पहायला मिळाले. भारताने सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा अवलंबिला. पहिल्या क्वार्टरमध्येच २–० ने आघाडी घेतली. अभिषेकने १२ व्या मिनिटाला मैदानी गोल डागला तर हरमनप्रीत सिंगने १३ व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरचा फायदा ◀◀ पान २ वर

## धाराशिव, छत्रपती संभाजीनगर नाव कायम राहणार !

### राज्यांना शहरांची नावे बदलण्याचा अधिकार – सर्वोच्च न्यायालय

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**धाराशिव आणि छत्रपती संभाजीनगर या शहरांची नावे बदलण्याच्या निर्णयाविरोधातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळली. या प्रकरणी न्यायालय हस्तक्षेप करणार नाही, राज्यांना नाव बदलण्याचा अधिकार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले. न्यायमूर्ती ह्षिकेश रॉय आणि एस.व्ही.एन. भाटी यांच्या खंडपीठाने हा निर्णय घेतला.**



औरंगाबाद आणि उस्मानाबाद या शहरांचे अनुक्रमे छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिव असे नामांतर करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य प्राधिकरणाने घेतला होता. या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आली होती. त्या याचिकेवर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने ◀◀ पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०३ ऑगस्ट २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू :१५.५० क्विंटल | | |
| २,२७१ | २,६४१ | २,४७० |
| ज्वारी/हायब्रिड :४३.५० क्विंटल | | |
| २,२०० | २,६४० | २,३८८ |
| मूग :१४.५० क्विंटल | | |
| १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : २.०० क्विंटल | | |
| ९,४०१ | ९,४०१ | ९,४०१ |
| उडीद : २.५० क्विंटल | | |
| ४,९०१ | ७,४०० | ६,१५० |
| बाजरी: ३२.५० क्विंटल | | |
| २,५३२ | २,७३३ | २,६१२ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | | |
| १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १३.०० क्विंटल | | |
| ४,२६० | ४,३०० | ४,२८० |
| हरभरा: ३.५० क्विंटल | | |
| ४,५०० | ६,५९९ | ५,६५१ |

# मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या लाभासाठी महिलांना ई–केवायसी करणे गरजेचे

## अन्न व नागरीपुरवठा विभागाचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील गरीब कुटुंबांना वार्षिक तीन गॅस सिलिंडर पुनर्भरण मोफत देणारी मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना राज्य शासनाने जाहीर केली आहे. या योजनेच्या सुलभ लाभ घेता यावा यासाठी लाभार्थींनी त्यांच्या संबंधित गॅस एजन्सीकडे जाऊन ई– केवायसी करावी. तसेच लाभार्थ्यांचे बँक खाते आधार सलग्न करून घ्यावे, असे आवाहन अन्न व नागरी पुरवठा विभागामार्फत करण्यात आले आहे.**



गरीब कुटुंबातील महिलांना धूरमुक्त वातावरणात स्वयंपाक करता यावा, तसेच त्यांच्या आरोग्यमानात सुधारणा व्हावी यासाठी एलपीजी गॅसचा वापर सर्वात सुरक्षित आहे. परंतु गॅस जोडणीधारकांना बाजार दराने गॅस जोडण्यांचे पुनर्भरण करणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. त्यांना गॅस पुनर्भरण करणे शक्य होत नसल्यामुळे ते वृक्षतोड करून पर्यावरणास हानी पोहचवतात. त्याअनुषंगाने राज्यात मुख्यमंत्री अन्नपूर्णा ◀◀ पान २ वर

### माझी लाडकी बहिण योजनेचे मराठीतील अर्जही मंजूर होणार !

'मुख्यमंत्री– माझी लाडकी बहीण' योजनेला राज्यात उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या योजनेसाठी मराठीमध्ये अर्ज करण्यात आले आहेत. पात्र महिलांचे मराठी भाषेमध्ये केलेले अर्ज ग्राह्य धरले जातील. मराठीमधील अर्ज नामंजूर होणार नाहीत, असे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, अर्जाची प्रक्रिया करत असताना काही तांत्रिक अडचणीमुळे मराठी भाषेतील अर्जाचा विषय चर्चेला आला होता. परंतु ही तांत्रिक अडचणी संबंधित बँकेने सोडविली आहे. त्यामुळे मराठीमध्ये केलेले अर्ज स्विकारले जाणार आहेत. असे त्यांनी स्पष्ट केले.

### आशा सेविकांना मोबाईल आणि रिचार्जही !

राज्य सरकारने आगामी निवडणुकीच्या दृष्टीने महिला मतदारांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. आता लाडकी बहीण योजनेसोबतच आशा सेविकांना देखील निवडणूकपूर्व एक भेट दिली आहे. मोबाईलसोबतच त्यांना आता रिचार्जचीही व्यवस्था सरकारने केली आहे. या संबधीची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केली. खनिज विकास निधीमधून वर्षभर रिचार्जची ही रक्कम दिली जाईल, या विषयीची मागणी गेले अनेक दिवस केली जात होती. यासोबतच वाढीव मानधन संदर्भात जीआर निघाला, मात्र अजून पैसे मिळाले नाहीत अशी तक्रार लक्षात घेता या महिन्यात ते पैसे जमा होतील, असेही आश्वासन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी नागपूर येथे दिले.

cmyk

अग्रलेख

# हा शैक्षणिक खेळ जिवघेणा ठरतोय !

देशात कोणतीही मोठी दुर्घटना घडली की लोक जागे होतात. आंदोलन किंवा निषेधाचे सूर उमटू लागतात. चौकशी समित्यांची नियुक्ती केली जाते. दोषींना कठोर शिक्षा केली जाईल, असे छापील वाक्य ठोकून सरकारही मोकळे होते. थोड्याच दिवसांत या सगळ्यावर पाणी पडते. त्यात मृत्युमुखी पडलेले आणि ती घटनाच नेमकी कशामुळे घडली यांनाही त्यांच्याच मरणाने मरणासाठी सोडून दिले जाते. लोकांचे जीवन तसेच पुढे सुरू राहते आणि चमकणारे चेहरे एक एक करत गायब होतात. हे सगळे झाल्यावर सगळे जण पुन्हा तेथेच येऊन थांबतात जेथे ते ती दुर्घटना घडण्याच्या अगोदर उभे होते. मागच्या आठवड्यात राजधानी दिल्लीत एक धक्कादायक घटना घडली. कोचिंग संस्थेच्या बेसमेंटमध्ये अचानक पाणी भरल्यामुळे 'आयएएस'ची तयारी करत असलेल्या तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. परवानगी न घेता बेसमेंटमध्ये अभ्यासिका चालवली जात होती, असे समोर आले. दुर्घटनेनंतर कायदा यंत्रणेच्या सगळ्या संस्था अचानक सक्रिय झालेल्या दिसल्या. आता याचा तपास सीबीआयकडे देण्यात आला आहे. तपासात जे बाहेर येईल ते येईल मात्र यात तीन जीव गेले ते कधीच परत येणार नाहीत. या घटनेला सदर कोचिंग क्लास तर जबाबदार आहेच, मात्र शैक्षणिक क्षेत्रात जी जिवघेणी व्यवस्था तयार झाली आहे, तिच्याकडे डोळसपणे बघण्याची गरज आहे.

सर्व प्रकारच्या माध्यमांमुळे आणि त्यातही शिक्षणाचा धंदा करणाऱ्यानी केलेल्या बेसुमार जाहिरातींमुळे छोट्या छोट्या गावांतील मुले मोठ्या शहरांची वाट धरत आहेत. ऐपत नसूनही आपल्या मुलाची वा मुलीची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी आणि स्वत:चे उर्वरित आयुष्य तरी सुखकर होईल अशी अपेक्षा बाळगून पालक पोटाला चिमटा घेऊन मुलांना शहरांत पाठवतात. मुलेही परिस्थितीची जाण असल्यामुळे आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवून कठोर कष्ट घेतात कारण त्यांना अपयशी होऊन चालणार नसते. मोठ्या शहरांत ते जगतात कसे? ही शहरे त्यांच्यासाठी सुरक्षित आहेत का? बुधवारीच केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले की मुलांना कोचिंग सेंटरच्या या बाजारातून बाहेर काढण्याची सरकारची इच्छा आहे. त्याकरता आर्थिक, सामाजिक आणि अन्य सर्व पैलूंचा विचार करावा लागणार आहे. शिक्षण मंत्र्यांचा मनोदय चांगला आहे. मात्र, त्यातील सगळ्यात पहिली अट आहे ती शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची. त्याकरता सगळी यंत्रणा कामाला लावून संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचीच सर्जरी करावी लागणार आहे. एक-दोन शिक्षण संस्था अथवा काही शाळा-महाविद्यालये अथवा विद्यापीठे आजच्या स्थितीला जबाबदार नाही. आज कोणत्याही क्षेत्रात प्रवेश घ्यायचा असेल तर प्रवेश परीक्षा अनिवार्य आहे. परीक्षा म्हटले की तिची तयारी आली, त्याकरता अधिकचा वेळ देणे आणि त्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन आले. या क्रमाने पुढे जातच कोचिंग संस्थांचा जन्म झाला आहे. त्यांनी स्वप्ने दाखवली आहे व ज्यांची स्वप्नपूर्ती झाली आहे असे विद्यार्थी विविध जाहिरातींत आणि आता तर चित्रपटांतही झळकले आहेत. या सगळ्या प्रकारात शाळा-महाविद्यालयांतील उपस्थिती आणि तेथील परीक्षांना केवळ औपचारिकतेचेच स्वरूप आहे. किमान पदवी घेऊन स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्यांचे एकवेळ बाजूला ठेवू, शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना राजस्थानातील कोटाच्या गाडीत बसवले जाते. बेताचीच अथवा नसलेली आर्थिक स्थिती, अपेक्षांचे प्रचंड ओझे आणि पुढे गेल्याशिवाय पर्याय नसल्याची झालेली जाणीव या सगळ्यांत विद्यार्थी केवळ धावतो आहे. त्यात शिक्षणाचा बाजार मांडणाऱ्यांची पकड दिवसेंदिवस घट्ट होत चालली आहे.

शिक्षणमंत्र्यांनी संसदेत जे सांगितले त्यामुळे त्यांना नेमके दुखणे काय आहे हे कळले आहे, असे समजण्यास हरकत नाही. मात्र, त्यावर उपाय काय करणार आहेत आणि कसा करतील यावर पुढचे सगळे अवलंबून आहे. सरकार किंवा व्यवस्था शिक्षण संस्था आणि कोचिंग संस्थांमध्ये नेमके काय चालले आहे याबाबत किती उदासीन असते हे ठराविक अंतराने समोर येत असलेल्या घटनांमुळे स्पष्ट होतच असते. या अनास्थेमुळेच आपण देशातील युवा वर्गाच्या स्वप्नांशी खेळतो आहोत व हा अक्षम्य आणि आत्मघाती अपराध असल्याचे बाजार चालवणाऱ्यांच्या लक्षात येत नाही. एका घटनेनंतर १३ संस्थांवर कारवाई झाल्याचा आकडा दिला गेला. हे पुरेसे असेल असे त्यांना वाटत असेल तर एकूण स्थिती अवघड आहे.

लोकसंख्या वाढत चालली आहे व त्याच प्रमाणात शिक्षण क्षेत्रावरचा दबावही वाढत चालला आहे. आपल्या सगळ्या समस्यांचे कारण लोकसंख्या हे असले आणि ते काही प्रमाणात खरेही असले तरी केवळ त्याकडे बोट दाखवून आपण पुढे जाऊ शकणार नाही. शिक्षण हेच समाजमन विकसनाचे, निर्मितीचे आणि प्रगतीचे साधन आहे. भविष्यातील घटनांवर आजच्या शिक्षणाच्या वर्तमानाचा प्रभाव पडत असतो. दिल्लीसारख्या घटना जेव्हा घडतात किंवा कोटामध्ये अकाली जीवन संपवण्याचे टोकाचे पाऊल उचलले जाते तेव्हा तो केवळ त्या दिवसाच्या बातमीचा विषय राहात नाही. यावर आता जागरूकपणे विचार करावा लागेल आणि पाऊल उचलावे लागेल.

# पावसाची हुलकावणी, शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे

कृषी वार्ता । नागनाथ वारद

**अनेक दिवस उलटून गेले अंबाजोगाई तालुक्यात पावसाने हुलकावणी दिली आहे.त्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत.ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली त्या शेतकऱ्यांना बियाणे उगवण्याची तर न पेरणाऱ्या शेतकऱ्यांना पेरणीयोग्य पाऊस कधी पडेल याची चिंता लागली आहे.**



जवळपास ६० टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. त्यात सर्वाधिक पेरा सोयाबीनचा झाला आहे. मध्यंतरी झालेल्या पावसाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. तात्काळ उघडीप मिळाल्याने घाईघाईत पेरणी करून घेतली. मात्र आता नुसते वारेच सुटल्याने पेरलेलेही उगवते की नाही याची चिंता लागली आहे. तर ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली नाही, असे शेतकरी मोठ्या पावसाच्या प्रतिक्षेत बसले आहेत. पावसाने ओढ दिल्याने पेरणीचा हंगाम लांबला आहे. पहिल्या पावसात शेतकऱ्यांनी खते, बियाणे खरेदी करून ठेवले. मात्र, पावसाने ओढ दिल्याने शेतकऱ्यांचे डोळे आभाळाकडे लागले आहेत. आतापर्यंत झालेल्या पेरणीत मोठ्या टक्केवारीत सोयाबीनचा पेरा झाला आहे. उर्वरित क्षेत्रावर तर सोयाबीनशिवाय इतर पिक घेणे कठीण होणार आहे.

**काही ठिकाणी पेरण्याच खोळंबल्या**

तालुक्यातील काही ठिकाणी तुरळक पाऊस झाला त्यातच शेतकऱ्यांनी उन्हाळी शेतीची मशागत पुर्ण करून पेरण्याही उरकल्या आता पाऊस पडतो याची वाट बघत आहे. पावसाने दडी मारल्याने शेतकरी वर्ग चिंतातूर झाला असून खरीप हंगामात काही ठिकाणी पेरण्या झाल्या आहेत तर अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात पेरण्या पूर्णपणे खोळंबल्या आहेत. वरूणराजाच्या आगमनास होत असलेला विलंब व भूगर्भातील पाणी पातळी दिवसेंदिवस कमी होत चालल्याने उन्हाळी पिकांच्या वाढीवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊ लागला आहे. जुलै महिना संपला ऑगस्ट मध्ये पावसाच्या आगमनाची साधी चाहूल नाही.गतवर्षी चांगला पाऊस झाल्याने पाण्याची कमरता जाणवली नाही.हवामान खात्याने यंदा जाहीर केलेल्या अंदाजाने शेतकरी सुखावला होता. थोडक्या पावसाने जमीन ओली केली मात्र आता पावसाने दडी मारल्याने या पिकास पाणी कमी पडू लागले पेरलेले उगवेल काय यामुळे शेतकरी चिंतातुर आहे. गेली दोन वर्षे खरिपाच्या पेरणीसाठी वेळेवर पाऊस झाला होता. यामुळे पैसे देणारे पीक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सोयाबीनचा पेरा जास्त क्षेत्रावर झाला आहे गेली दोन वर्षे समाधानकारक पाऊस झाल्याने भूगर्भातील पाणी पातळीत वाढ झाली होती. त्याचा परिणाम विहीर बागायत क्षेत्रातदेखील ऊसाची लागवड मोठ्या प्राणावर झाली आहे. मात्र, आता पावसाने ओढ दिल्याने या पिकास पाणी कमी पडू लागले आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी बऱ्यापैकी ऊसाची लागवड असल्याने त्यांची मदार विहिरीच्या पाण्यावर असते. मात्र आता पाऊस कमी झाला आणि विहीरीचे पाणी पिकाला पुरेनासे झाले आहे. आता चांगला पाऊस झाल्यासच उर्वरीत खरिपाची पेरणी होऊ शकेल. असा अंदाज शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# पीएम किसान योजना मोडीत काढण्याचा शासनाचा घाट-भाई थावरे

## जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीवर कृषी आधिकाऱ्यांनी टाकला बहिष्कार

माजलगाव । प्रतिनिधी

**पीएम किसान योजनाही शेतकऱ्यांसाठी फायदेशीर योजना आहे. मात्र योजनेसाठी कृषी आधिकाऱ्यांकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने लाभार्थी वंचित राहात आहेत. एकंदरीत पीएम किसान योजना मोडीत काढण्याचा शासनाचा घाट असल्याचा आरोप शेतकरी नेते भाई थावरे यांनी केला आहे. दरम्यान यासंदर्भात दि ०२ ऑगस्ट शुक्रवारी जिल्हाधिकाऱ्यांनी पीएम किसान आढावा बैठकी आयोजित केली होती.परंतु कृषी आधिकाऱ्यांनी बैठकीला अनुपस्थित राहात बहिष्कार टाकला असल्याची माहिती थावरे यांनी दिली.**



पाच वर्षांपूर्वी जिल्ह्यात पीएम किसान योजना लागू झाली. मात्र ७० ते ८० हजार अर्ज पडून असून माजलगाव विधानसभा मतदारसंघात २५ ते ३० हजार लाभार्थी लाभापासून वंचित आहेत. यामुळे शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष भाई गंगाभिषण थावरे यांनी आंदोलनाचा इशार दिला होता. दरम्यान पीएम किसान योजनेचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शुक्रवारी दि.०२ ऑगस्ट जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा कृषी विभागाची जिल्हा बैठक घेण्यात आली.यावेळी केवळ भाई थावरे यांच्यासह एस.ओ साळवे,कृषी कार्यालयातील खेडकर उपस्थित होते.दरम्यान पीएम किसान योजना ही केंद्र शासनाची योजना असून या संदर्भात कृषी आधिकारी, कर्मचाऱ्यांना कसल्याही प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले नाही. योजनेच्या अंमलबजावणीसाठी पुरेसे मनुष्यबळ कृषी कार्यालयांकडे नाही.विशेष म्हणजे लाभार्थ्याने योजनेसाठी अर्ज केल्यापासून ४५ दिवसांत त्याला लाभ द्यावा अशी अट योजनेची आहे. मात्र मनुष्यबळा अभावी लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित राहावे लागत आहे असे कारण सांगत तालुका कृषी आधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीस अनुउपस्थित राहात बहिष्कार टाकला असल्याचे थावरे म्हणाले.पीएम योजनेसाठी जिल्ह्यातील ७ लाख लाभार्थ्यांनी अर्ज केला असून केवळ ३ लाख ७५ हजार लाभार्थ्यांना लाभ मिळतो. कृषी मंत्र्यांच्या जिल्ह्यात लाभार्थ्यांना योजनेपासून वंचित राहावे लागते ही लाजिरवाणी बाब असून केंद्र व राज्यशासनाला अन्नदात्याची ही योजना मोडीत काढण्याचा घाट असल्याचा आरोप शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी केला आहे.

# रुई गावाचा २५ वर्षाचा विकासाचा अनुशेष एका वर्षात भरून काढणार-सतीश घाटगे

अंबड । प्रतिनिधी

**प्रामाणिक करदात्यांच्या पैशातून आणि महाराष्ट्र सरकारच्या सहकार्यातून रूई गावाचा २५ वर्षाचा विकासाचा अनुशेष सतीश घाटगे यांनी फक्त एका वर्षात भरून काढला आहे. गावकऱ्यांनी मागणी केलेले सर्व कामे सतीश घाटगे यांनी पूर्ण करून गाव समृद्ध केले. सोमवारी त्यांच्या हस्ते पूर्ण झालेल्या सर्व कामाचे लोकार्पण करण्यात आले.**



समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील संविधानिक पदावर नसताना विविध घटकांच्या प्रमुख समस्या मार्गी लावत आहे. रुई हे गाव २५ वर्षापासून विकासाच्या प्रवाहाच्या बाहेर होते. या गावातील रस्त्याचा प्रश्न बिकट होता. सतीश घाटगे यांच्या प्रयत्नातून गावाच्या दृष्टीने महत्वाचे असलेले सर्व रस्ते सिमेंट कॉंक्रीटने तयार झाले आहे. रुई गावातील अंतर्गत रस्ते, स्मशानभूमी यासह तांड्याला जोडणाऱ्या रस्त्याचा प्रश्न देखील सतीश घाटगे यांनी सोडवला. तसेच नव्याने मंजूर करून आणलेल्या विविध विकास कामांचे उद्घाटनही यावेळी करण्यात आले. या विकासकामामुळे रुई गावाचा विकासाचा अनुशेष खऱ्या अर्थाने २५ वर्षानंतर भरून निघाला अशा अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. गावचे विकासप्रिय उपसरपंच ईश्वर धाईत यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. या लोकार्पण सोहळ्यास डॉ. रमेश तारगे, राहुल कणके, अरुण घुगे, चंद्रकांत बांगर,शरद खरपडे, राजेंद्र येसलोटे, वसंतराव खोजे, गणेश खोजे, माधव टेहळे, बंडू शिंगटे, कृष्णासिंग पवार, परमेश्वर शिंदे, नवनाथ डोईफोडे उद्धव लांडे यांची उपस्थिती होती.

# दिंद्रुडच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील लिपीक रमेश जाधव सेवानिवृत्त

दिंद्रुड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील कनिष्ठ लिपीक रमेश जाधव बुधवारी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त सहकाऱ्यांच्या वतीने निरोप देऊन सन्मानसोहळा आयोजित करण्यात आला. स्वराज्य मंगल कार्यालय येथे झालेल्या कार्यक्रमास नातेवाईक, स्नेहीजण व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या रमेश जाधव यांनी गेल्या १९ वर्ष ९ महिने वर्षांपासून सिंदफणा प्रसारक मंडळाच्या विविध शाळांत लिपीक म्हणून सेवा केली. दिंद्रुड, टाकरवण येथील माध्यमिक विद्यालयात लिपीक म्हणून त्यांनी काम पाहिले . सेवानिवृत्ती निमित्त त्यांच्या सन्मानाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष अध्यक्ष म्हणून प्राचार्य जी.व्ही.उजगरे तर सिंदफणा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रतापराव रांजवण, सौ. वर्षाताई प्रतापराव रांजवन, भाजपा नेते रमेश आडसकर, दिपकराव जाधव(माजी चेअरमन खरीदी विक्री संघ माजलगाव ), परमेश्वर जाधव (राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष संघटना जिल्हा अध्यक्ष), धर्मराज शेजूळ (स.शि.परभणी ), भगवान रामभाऊ जाधव , अशोकराव सोळंके व माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या प्रमुख उपस्थितीत सेवानिवृत्तीचा कार्यक्रम संपन्न झाला. विद्यालयाच्या वतीने सेवानिवृत्ती निमित्त रमेश जाधव यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष शिवाजीराव रांजवन व सचिव प्रतापराव रांजवन यांनी जाधव यांना निरोगी व सदृढ आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. सर्वांशी मिळता जुळता व लाघवी स्वभावामुळे जाधव यांच्या सेवानिवृत्तीने शिक्षकांसह विद्यार्थ्यांना गहिवरून आले होते. संस्थेत सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल जाधव यांनी कै. सोनाजी बापू रांजवण यांच्यासह रांजवण यांच्या परिवाराचे आभार मानले.

## पान १वरून...

### खा.सोनवणे यांनी संसदेत मांडला

भाषणात केली. त्यांनी केलेल्या मुद्देसूद भाषणाची जिल्हाभर चर्चा होत आहे. दिल्ली येथे लोकसभा अधिवेशन सुरू असून दि.२ ऑगस्ट रोजी आरोग्य मंत्री यांच्या उपस्थितीत खा.बजरंग सोनवणे यांनी सभागृहातील पहिले भाषण केले. यावेळी बोलताना ते म्हणाले, मी जिथे राहतो त्या भागाची ओळख ऊसतोड कामगारांचा जिल्हा अशी आहे. ऊसतोड कामगारांचा जिल्हा म्हणून माझ्या जिल्ह्यावर फक्त राजकारण केले गेले. मात्र माझ्या ऊसतोड कामगारांसाठी कुठल्याही सोयीसुविधा आजवर या राजकारण्यांनी दिल्या नाही. या ऊसतोड कामगारांसाठी विशेष तरतूद करावी. हातात कोयते घेऊन रात्रंदिवस आमच्या मायमाऊल्या शेतावर ऊस तोडतात. त्यांचेही प्रश्न सोडवले गेले पाहिजेत. जिल्ह्याच्या आरोग्यावर बोलताना ते म्हणाले, जिल्ह्यात एक वैद्यकीय महाविद्यालय, मोठे सरकारी इस्पितळ, शेकडो आरोग्य केंद्र आहेत. परंतु या आरोग्य केंद्रांवरती स्टाफच उपलब्ध नाही. या सुविधा आपण उपलब्ध करून द्याव्यात. जिल्ह्याला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय झाले तर इथल्या गुणवान विद्यार्थ्यांच्या कष्टाला फळ येऊन ते इथेच आपले शिक्षण पूर्ण करून वैद्यकीय सेवा देतील. त्यामुळे विशेष पॅकेज देऊन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या ठिकाणी देण्यात यावे. जिल्ह्याच्या ठिकाणी स्त्री रुग्णालय सुद्धा नाही. इथे स्त्री रुग्णालय झाले पाहिजे. महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी स्त्री रुग्णालयाची अत्यंत आवश्यकता जिल्ह्याला आहे. अंबाजोगाई शहरात जे वैद्यकीय महाविद्यालय आहे, तेथे ५० विद्यार्थ्यांची क्षमता असताना कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली होती. आज तिथे विद्यार्थ्यांची संख्या १५० झाली आहे. परंतु स्टाफ मात्र तेवढाच आहे. डॉक्टर, नर्सेस, वर्ग ३, ४ हा स्टाफ तेव्हा भरती झाला, तेवढाच मर्यादित आहे. त्यामुळे इथे आता नव्या कर्मचाऱ्यांची गरज आहे. ती वाणवा सरकारने तात्काळ भरून काढावी, अशी आग्रही मांडणी त्यांनी यावेळी केली. अंबाजोगाईच्या दवाखान्यातील सिटीस्कॅनची मशीन वारंवार बंद पडते. त्यामुळे रुग्णांची हेळसांड नेहमीचीच आहे. तिथे नवीन मशीन घेण्यासाठी स्थानिक प्रशासनाला सूचना आरोग्यमंत्र्याच्या माध्यमातून करण्यात याव्यात. तसेच जिल्हा रुग्णालयात व्हेंटिलेटर व इतर आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना द्याव्यात. असेही ते म्हणाले.

----------

### सरकार शेतकरी कर्जमाफीच्या

मास्टरस्ट्रोक म्हणून कर्जमाफीचा वापर करता यावा यासाठी निवडणुकीची आचारसंहीता लागू होण्याच्या तोंडावर कर्जमाफी जाहीर होऊ शकते. पण सरकारने निवडणुकीच्या आचारसंहीतेच्या तोंडावर कर्जमाफी जाहीर केली तर अधांतरीच राहू शकते. जसे भावांतरचे झाले. राज्य सरकारने, मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी लोकसभा निवडणुकीची आचारसंहीता लागू होण्याच्या आधी भावांतर योजना जाहीर केली होती. त्यानंतर आचारसंहीतेमुळे भावांतरचे पैसे देता येत नाही, असेही सरकारने सांगितले होते. आता याही वेळी घोषणा केली आणि त्याची अंमलबजावणी करता आली नाहीतर हा निवडणुकिचा फंडा होईल आणि त्याचा फटका बसेल असे सरकारला वाटत असल्याने लवकर कर्जमाफी करून त्याची अंमलबजावणी करण्याकडे सरकारचा कल असल्याचे सांगण्यात येत आहे, ज्यामुळे याचा निवडणुकित फायदा होईल.

------------

### निवडणूक रोखे चौकशीसाठीच्या

त्यानंतर निवडणूक रोख्यातील कथित गैरव्यवहाराची विशेष तपास पथकाच्या वतीने चौकशी केली जावी, अशा मागणी करणाऱ्या काही याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या होत्या. या याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळल्या. या प्रकरणात घटनेतील कलम ३२ नुसार आम्ही आमचे अधिकार वापरू शकत नाही, असे न्यायमूर्तींनी म्हटले आहे. ''जेव्हा निवडणूक रोखे विकत घेतले गेले आणि राजकीय पक्षांना ते देणगी म्हणून देण्यात आले, त्या वेळी संसदेत तसा कायदा मंजुर झालेला होता. शिवाय राजकीय पक्षांनी यामध्ये गैरव्यवहार केल्याचा आरोप फक्त तर्कांच्या स्वरूपात आहे,'' असे या निकालात म्हटले आहे. ज्या ठिकाणी वैयक्तित तक्रारी आहेत, त्याबद्दल योग्य त्या कायद्यानुसार दाद मागितली पाहिजे, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

-----------

### चिल्लर लोकांच्या काय फोडता ; शरद पवार, उद्धव

लोकांच्या काय फोडताय? यांच्या गाड्या फोडून काहीच होणार नाही. तुम्हाला गाड्या फोडायच्या असेल तर चार माणसांची नावे मी तुम्हाला देतो, त्यांच्या गाड्या फोडा. शरद पवार, देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे. अजित पवार यांच्या गाड्या फोडा, असे आवाहन प्रकाश आंबेडकर यांनी केले आहे.

---

### तात्काळ पंचनामे करून शेतकरी,

विविध जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे १ लाख २४ हजार हेक्टरहून अधिक पिकांचे नुकसान झाले आहे. तसेच पूरपरिस्थितीमुळे ९४ नागरिकांना आपला जीव गमवावा लागला असून ३ हजारांहून अधिक पशुधनही दगावले आहेत. घरात पाणी शिरल्याने हजारो घरांचे नुकसान झाले आहे. त्याचवेळी उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील काही ठिकाणी पाऊस पडलेला नाही त्यामुळे तिथे दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. यामुळे शासनाने ही बाब गांभीर्याने घेवून आवश्यक ती मदत शेतकरी आणि नागरिकांना तात्काळ दिली पाहिजे.

----------

### धाराशिव, छत्रपती संभाजीनगर

हा निकाल दिला. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश कायम ठेवला. दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने मे महिन्यात शहरांच्या नामांतराला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळून लावल्या होत्या. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारने २९ जून २०२१ च्या मंत्रिमंडळ बैठकीत औरंगाबाद आणि उस्मानाबाद या दोन्हींचे नाव बदलण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर १६ जुलै २०२२ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील नवीन सरकारने महाविकास आघाडी सरकारच्या निर्णयाची पुष्टी केली.

-------------

### चक दे इंडिया, भारताचा

उठवत संघाची आघाडी दुप्पट केली. सामन्याच्या पहिल्या तीन मिनिटांतच दोनदा कांगारूंच्या डी मध्ये धडक मारली. गोल करण्याची संधी होती, पण त्यात यश आले नाही. ऑस्ट्रेलियानेही पलटवार करत दोन मिनिटांत दोनदा भारताची बचावफळी भेदण्याचा प्रयत्न केला. पण ते अपयशी ठरले. त्यांनी दहाव्या मिनिटाला जोरदार आक्रमण केले. त्यांना पेनल्टी कॉर्नरही मिळाला. मात्र भारताने गोल होऊ दिला नाही.

----------

### मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेच्या लाभासाठी

योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत राज्यातील प्रधाममंत्री उज्ज्वला योजना आणि 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थ्यांना वार्षिक ३ गॅस सिलिंडरचे पुनर्भरण मोफत देण्यात येणार आहेत. यासाठी गॅस एजन्सीकडे ई- केवायसी करण्याची गरज असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाने म्हटले आहे.

---------

### वायनाडमध्ये १०० घरे

मी हा मुद्दा केंद्र आणि राज्य सरकारांसमोर मांडणार आहे, कारण या शोकांतिकेला अनोखे आणि तातडीच्या प्रतिसादाची गरज असल्याचे मतही यावेळी व्यक्त केले. राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, आमचे तात्काळ लक्ष बचाव, मदत आणि पुनर्वसन या प्रयत्नांवर आहे. कॉंग्रेस परिवार येथे १०० हून अधिक घरे बांधण्यासाठी कटिबद्ध आहे. या गरजेच्या वेळी आमच्या बंधुभगिनींना शक्य ती सर्व मदत केली जाईल याची खात्री करण्यासाठी आम्ही समर्पित आहोत असेही यावेळी सांगितले.

----------

## पान ६ वरून...

### जय भवानी परिवारानं

बांधिलकीच्या धोरणानुसार मी महाविद्यालयाचे काम करीत राहिले. त्यासाठी आदरणीय जयसिंह पंडित साहेब, युवा नेते मा. विजयसिंह पंडित साहेब यांचेही मला मोलाचे मार्गदर्शन लाभले, असे सांगून प्राचार्य डॉ. कांचन परळीकर म्हणाल्या, नवीन पिढीतील मा. रणवीर अमरसिंह पंडित व मा. पृथ्वीराज जयसिंह पंडित यांच्या सोबत ही काम करण्याचा अनुभव घेता आला. संस्थेचे प्रशासन अधिकारी श्री. गोरकर सर, भैय्यासाहेबांचे स्वीय सहायक श्री. अमृत डावकर, श्री. गोगुले सर, श्री. हातोटे सर यांचे वेळोवेळी सहकार्य मिळाल्याने मी सर्वांना सोबत घेऊन काम करु शकले.यावेळी प्राचार्य डॉ. कांचन परळीकर यांनी आपल्या सेवा काळातील काही जुन्या आठवणी सांगून सर्वांना भावूक केले.अध्यक्षीय समारोपात श्री. प्रमोद गोरकर म्हणाले की, महाविद्यालयाच्या प्राचार्य म्हणून डॉ. कांचन परळीकर यांनी संस्था व कर्मचारी यांच्यातील दुवा म्हणून उत्तम काम केले आहे. प्रशासनामध्ये किती ही मोठी अडचण आली तरी मॅडम ती सहज सोडवत असत. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे त्या दुसऱ्यांचा चुका समजून घेत त्यावर पांघरूण घालीत असत. संस्थेच्या शासकीय, विद्यापीठीय अशा कोणत्याही कामात आम्हाला मॅडमचा आधार वाटत असे, असे सांगून श्री. गोरकर म्हणाले की, अवघड काम सोपे कसे करायचे याचे उपजत कौशल्य प्राचार्य डॉ. कांचन परळीकर यांच्याकडे होते. या सोहळ्यात अनेकांनी आपले मनोगतही व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विश्वास कदम म्हणाले की, प्राचार्य डॉ. कांचन परळीकर यांची भूमिका ही कुटुंब प्रमुखांची होती. त्या सर्वांना सोबत घेऊन चालत असत. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या चुका स्वतः वर घेऊन त्या दुरुस्त करतांना त्यांना कधीच कमीपणा वाटला नाही. प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे म्हणाले की, प्राचार्य डॉ. कांचन परळीकर यांच्या संस्कारातूनच आम्ही घडलो आहोत. त्यांच्याकडून प्रशासनातील अनेक गोष्टी आम्हाला शिकायला मिळाल्या. यावेळी प्रा. बापू घोक्षे, निवृत्त प्रा. डॉ. भीष्मा रासकर, निवृत्त प्रा. डॉ. बी.एम.अहीरे, बीडच्या देवगिरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, र.भ.अट्टल महाविद्यालयाचे प्रा. डॉ. प्रविण सोनुने, प्रा. डॉ. संतोषकुमार यशवंतकर, निवृत्त प्रा. अलका घोडके यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. कांचन परळीकर या अत्यंत प्रेमळ प्रशासक होत्या, अशी संवेदनशील नोंद या वक्त्यांनी याप्रसंगी केली. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. नामदेव शिनगारे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. संगीता आहेर यांनी तर आभार प्रा. रामहरी काकडे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. राजाभाऊ चव्हाण, प्रा. बापू घोक्षे, प्रा. डॉ. नामदेव शिनगारे, प्रा. डॉ. संगीता आहेर, प्रा. डॉ. कैलास सावंत, प्रा. डॉ. शिवाजी दिवान, प्रा. डॉ. प्रविण शिलेदार, प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड, प्रा. डॉ. कल्पना घारगे, प्रा. रामहरी काकडे, प्रा. डॉ. कालीदास चौधरी, प्रा. डॉ. तबस्सुम इनामदार, प्रा. डॉ. जाहेद सिद्दीकी, प्रा. डॉ. संजय तळतकर, प्रा. डॉ. संजय भेदेकर, प्रा. बाबू वादे, प्रा. हीरा खरात, प्रा. महेश घोलप, श्री. गोविंद कापरे, श्री. भारत कांडेकर श्री. एकनाथ राठोड व श्री. मीठू तळेकर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला से.नि.प्राचार्य श्री. राजेंद्र घुंबार्डे, श्री. भास्कर घारगे, श्री. गरड आणि श्रीमती लाखोटे यांच्या सह विविध महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शहरातील नागरिक, प्राचार्य यांचे स्नेही व विद्यार्थीनींची उपस्थिती होती.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ३ ऑगस्ट २०२४


## लग्नाचे आमिष दाखवत युवतीवर अत्याचार

**परळी । प्रतिनिधी**

लग्नाचे आमिष दाखवत युवतीसोबत सलग एक वर्षापेक्षा जास्त दिवस सबंध ठेवत अत्याचार केल्याची घटना परळी शहरात समोर आली असून या प्रकरणी पीडित युवतीच्या तक्रारी वरून संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार शहरातील बरकत नगर भागात राहणाऱ्या एकोणीस वर्षीय युवतीसोबत त्याच भागातील ३५ वर्षीय इसमाने लग्नाचे आमिष दाखवत एक वर्षापेक्षा अधिक काळ सबंध ठेवत पीडितेच्या राहते वारंवार तिच्या ईच्छे विरूध्द अत्याचार केला व याबाबत कुठे वाच्यता केल्यास तुला जिवे मारून टाकीन अशी धमकी देत शिवीगाळ केली.या प्रकरणी पीडितेने स्वतःहून संभाजी नगर पोलीस ठाण्यात आपबीती सांगितल्यावर तिच्या फिर्यादीवरून संभाजी नगर पोलीस ठाण्यात गुरनं ११९/२०२४ कलम ६४ एम (२),३५२,३५१,(२),(३)भारतीय. न्याय संहिता २०२३ नुसार ३५ वर्षीय इसमाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विद्यमान आमदारांना घेरण्यासाठी अनेक इच्छुक उमेदवार मैदानात

### केजमधून माजी आ.साठे,माजी आ.प्रा.ठोंबरे,डॉ.घाडगे,जाधव इंजि.शिंदे,सिरसाट,गालफाडे इच्छुक

अंबाजोगाई, केज । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदार संघाच्या विद्यमान आ.नमिताताई मुंदडा यांना घेरण्यासाठी विरोधी पक्षाची टिम सक्रिय झाली असून ही निवडणुक राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी शेवटची संधी असल्याने या मतदार संघातील इच्छुक उमेदवार मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. सर्वच इच्छुक उमेदवारांनी लढण्याची तयारी सुरु केली आहे. कसल्याही परिस्थितीत आ.नमिताताई मुंदडा यांना पराभूत करण्याचा विडा अनेकांनी उचलला आहे. केज मतदार संघातून लढण्यासाठी माजी आ. पृथ्वीराज साठे, माजी आ.प्रा.सौ.संगिताताई ठोंबरे, डॉ.सौ.अंजलीताई घाडगे, सौ.मनिषाताई गोकुळ जाधव, इंजि. एन.डी.शिंदे, डॉ. नयनाताई सिरसाट,रमेश गालफाडे व इतरांनी जोरदार तयारी सुरु केली आहे.दर निवडणुकीपेक्षा ही निवडणुक वेगळी असणार आहे. कारण या निवडणुकीला जातीपातीचा रंग आहे शिवाय जिंकणार कोण याचेही उत्तर कोणाकडे नाही. त्यामुळे ही निवडणुक चुरशीची होणार आहे.

केज विधानसभा मतदार संघ हा गेल्या ४५ वर्षापासून आरक्षित आहे. २००९ साली या मतदार संघाची पुर्नरचना झाली पण पुन्हा हा मतदार संघ अनुसुचित जाती जमातीसाठी आरक्षित झाला. खुल्या प्रवर्गातील उमेदवार लढण्यासाठी इच्छुक असतानाही आरक्षित जागेमुळे अनेकांना आमदार होता आलेले नाही. जवळपास राजकारण्यांच्या तीन पिढ्या यात गेल्या आहेत. २०२९ साली हा मतदार संघ अनारक्षित राहणार असल्याने अनेकांनी



गुडघ्याला बाशिंग आतापासून बांधले आहे. २०२४ ची निवडणुक ही आगळीवेगळी आणि अनपेक्षित होणार आहे. विद्यमान आमदारांना घेरण्यासाठी जोरदार रणनिती सुरु आहे. विद्यमान आमदारांविषयी केज विधानसभा मतदार संघात नाराजीचा सूर आहे. विकास कामे झाली आहेत पण त्यातून विकास कोणाचा झाला हे मात्र सामान्य माणसाला उमगलेले नाही. मतदारसंघात आमदारांविषयी प्रचंड नाराजी आहे. समाज माध्यमातून या विषयी व्यक्त होत असल्याचे चित्र आहे. मराठा समाज आमदारांना आरक्षणाविषयीची भुमिका विचारतो आहे तर ओबीसी बांधव सुद्धा आमदारांना कोणाच्या बाजून आहात असा सार्वजनिक सवाल करीत आहेत. या मतदार संघात येणार्या विधानसभा निवडणुक ही चुरशीचा होणार आहे. अनेक इच्छुक उमेदवारांनी जोरदार तयारी सुरु केली आहे. केज विधानसभा मतदार संघाचे माजी आ. पृथ्वीराज साठे, माजी आ.प्रा.सौ.संगिताताई ठोंबरे, सामाजिक कार्यकर्त्या डॉ.अंजलीताई घाडगे, उद्योजिका सौ.मनिषाताई गोकुळ जाधव, रमेश गालफाडे, इंजि. एन.डी.शिंदे, ॲड.शिवाजी कांबळे, समाजसेवक रणधीर कांबळे,डॉ. नयनाताई सिरसाट,सौ.संगिता तुपसागर यांची नांवे पुढे आली आहेत ही निवडणुक विद्यमान आमदारांना म्हणावी तशी सोपी नाही. कारण सध्या सत्ताधार्यांविषयी जनसामान्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. फोडाफोडीचे राजकारण आणि भ्रष्टाचार्यांची सोबत सामान्य माणसाला पटलेली नाही. लोकसभा निवडणुकीत याचा प्रत्यय आलेला आहे. त्यामुळे केज मतदारसंघात कोण जिंकणार हे आज कोणीही ठाम सांगू शकत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे या निवडणुकीला रंगत येणार हे स्पष्ट आहे.



### सावता सेनेच्या वर्धापन दिनानिमित्त महिला जिल्हाध्यक्ष स्वाती कातखडे यांनी वृक्षारोपण करून केला साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

सावता सेनेच्या बीड जिल्हा महिला अध्यक्षा स्वातीताई कातखडे यांनी निसर्ग वाचविण्यासाठी, संकल्प हा,पर्यावरण संवर्धनचा निसर्गाच्या संरक्षणा साठी. सर्व काही ही वसुंधरा प्रफुल्लित व वृक्षाने सजलेली असावी हाच उद्देश ठेवून आपल्या संघटनेच्या वर्धापन दिना निमित्त वृक्षारोपन करुन सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा प्रयत्न केला आपल्या संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त हार तुरे बॅनर बाजी करून उगाच व्यर्थ खर्च करतात परंतु सावता सेनेच्या महिला बीड जिल्हाध्यक्ष स्वाती कातखडे यांनी आपल्या संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण करून आदर्श निर्माण केला हीच भूमिका प्रत्येक संघटनेने केली तर हे ओसाड पडलेलं डोंगर हे झाडांनी बहरायला वेळ लागणार नाही आणि पर्यावरण हे अतिशय उत्तम राहील वृक्षारोपण प्रसंगी पाटोदा नगरपंचायतचे सभापती रामेश्वर गोरे, दादा नाईकनवरे,दत्ता कातखडे,यांच्या सह महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या

## ग्रामीण भागातील सेवा केंद्राची तपासणी होणार –जिल्हाधिकारी पांचाळ

**जालना । प्रतिनिधी**

अंबड मध्ये ग्रामीण भागातील १६ केंद्र सुरू असल्याची माहिती तारक यांनी दिली गेली आहे. सदरी चालक केंद्रांना नोटीस देण्यात आली आहे कारवाई करून रद्द करण्यात येणार आहे. जालना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आपले सरकार सेवा केंद्र आणि आधार केंद्राची तपासणी सुरु करण्यात आली आहे. जालना शहरातील जुनी तहसील कार्यालयातील आधार केंद्र, शनी मंदिर जवळील आपले सरकार सेवा केंद्र, टाऊन हॉल येथील आधार केंद्र, गांधी चमन येथील पोस्ट ऑफिस या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने तपासणी करण्यात आली. तरी जिल्ह्यातील नागरिकांना चांगली सेवा वेळेत पुरविणे आणि समस्यांचे निराकरण करण्यासाठी आपले सरकार सेवा केंद्रासह आधार केंद्राची तपासणी करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिली आहे. तसेच या प्रकरणी अंबड शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातील सेवा केंद्र असल्याचे माहिती श्री तारक यांनी दिली आहे ते म्हणाले की ग्रामीण भागातील सेवा केंद्र अंबड शहरात १५ते १६ सुरू आहे त्यांना नोटिसा देण्यात आल्या आहे परंतु यामध्ये सुधारणा होत नाही म्हणून जिल्हाधिकारी यांच्या आदेशावरून कारवाई करून जे ग्रामीण भागातील सेवा केंद्र शहरात सुरू आहे ते रद्द करण्यात येणार आहे अशी माहिती श्री तारक यांनी दिली आहे .

शासनाने निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा नागरिकांकडून काही केंद्र चालक जास्त शुल्क आकारत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. केंद्रांवरील ऑपरेटरचे नागरिकांशी असभ्य किंवा अशोभनीय वर्तन आढळल्यास त्यावर योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे. नागरिकांना आदरपूर्वक आणि सन्मानाने सेवा देणे अत्यंत महत्त्वाचे असून सर्व केंद्रांनी दर फलक दर्शनीय भागावर लावलेली असावी तसेच नागरिकांना मागणी करता सहजपणे उपलब्ध करून द्यावी. दर फलक अनुपलब्धतेबाबत तक्रारी आल्यास त्यावर तात्काळ कारवाई करण्यात येणार आहे. सेवा केंद्रांनी त्यांच्या मुळ ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर केल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत तपासणी करून आवश्यक ती कारवाई केली जाणार आहे. आपले सरकार सेवा केंद्र व आधार केंद्रावर कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा. असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## ष.ब्र.१०८ श्री.गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज यांच्या श्रावणमास तपोनुष्ठानाचे आयोजन

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

द्वादश पंचम ज्योतीर्लिंग प्रभू वैद्यनाथाच्या दर्शनानिमित्त माजी खासदार तथा कर्नाटक राज्यातील नामांकीत शैक्षणिक संस्था लिंगायत एज्युकेशन सोसायटी,बेळगांव चे चेअरमन डॉ.प्रभाकर कोरे सह परीवार परळी- वैजनाथ येथे गुरूवार दि.१ ऑगस्ट रोजी आले असता त्यांचा वीरशैव लिंगायत समाज व श्रावणमास तपोनुष्ठान समिती परळीच्यावतीने श्री.वैजनाथ देवस्थान कमिटीचे विश्वस्त श्री.विजयकुमार मेनकुदळे व राष्ट्रसंत डॉ.शिवलिंग शिवाचार्य महाराज तपोनुष्ठान समितीचे अध्यक्ष तथा नगरसेवक चेतन सौंदळे यांच्यासह समाज बांधव व पदाधिका- यांच्यावतीने सत्कार करण्यात आला.



यावेळी ष.ब्र.१०८ श्री.गुरूपादेश्वर शिवाचार्य महाराज,गिरगांवकर यांच्या दि.५ ऑगस्ट ते दि.१७ ऑगस्ट २०२४ दरम्यान श्री.शनी मंदीर देवस्थान,वैद्यनाथ मंदीरच्या पायथ्याशी होणा-या श्रावणमास तपोनुष्ठान पत्रकाचे विमोचन डॉ.प्रभाकर कोरे यांच्या हस्ते करून त्यांना श्रावणमास तपोनुष्ठान समितीच्यावतीने निमंत्रित करण्यात आले. श्रावणमास तपोनुष्ठान कालावधीत दररोज अन्नप्रसाद,अखंड शिवनाम सप्ताह,परमरहस्य पारायम सोहळा,कीर्तन,प्रवचन,वृक्षदान सोहळा,वृक्षारोपण,जलपुनर्भरण,आरोग्य तपासणी शिबीर,सांस्कृतिक व विविध समाज उपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

याप्रसंगी म.बसवेश्वर एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग,अंबाजोगाई चे प्राचार्य श्री.बाबू खडकभावे सर,संजय मेनकुदळे,रमेशअप्पा सपाटे,सोमनाथअप्पा निलंगे,श्री.गुरूलिंग स्वामी मंदीराचे विश्वस्त अक्षय मेनकुदळे,वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रा.महेशश्वर निर्मळे,चंदूअप्पा उदगीरकर,संजय खाकरे,दयानंद चौधरी,चंदूअप्पा हालगे,प्रकाश खोत,सोमनाथ गोपनपाळे,मनोज संकाये,मकरंद नरवणे,संतोष पंचाक्षरी,जगदीश मिटकर,शिरीष सलगरे,कैलास रिकीबे,संदीप चौधरी,गणेश स्वामी,राहुल निर्मळे,योगेश स्वामी,गिरीष बेंबळगे,रवी मिसाळ,प्रशांत नरवणे,अरविंद चौधरी,अनिल मिसाळ,रमेश चौधरी सर,अनिल(बाळू)चौधरी व समाज बांधवांची उपस्थिती होती.

## खोलेश्वर महाविद्यालयात लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त कार्यक्रम संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दि. १ ऑगस्ट २०२४ रोजी खोलेश्वर महाविद्यालयात लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त श्री रमेश मोटे यांनी त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकताना म्हणाले की ''महान क्रांतिकारक देशभक्त '' लोकमान्य टिळक यांनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले .त्यांची देशभक्ती पुढे तसेच वातावरण निर्माण करणारे क्रांतिकारकाची साहित्याच्या माध्यमातून एक फळी निर्माण केली . अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यातून देशाला स्वातंत्र्य मिळवून देणारे व गरीबाची जीवन उन्नत करण्यासाठी तसे नायक उभे केले . अण्णाभाऊ ची फकीरा . वारणेचा वाघ ' श्मशानातील सोनं आणि भिवा



रामोशाची कथा सांगून विद्यार्थ्यांना मग्न धुंद केले . रमेश मोटे यांना अण्णाभाऊंच्या अनेक कथेवर प्रकाश टाकला .अन्याय अत्याचार भूक यासाठी लढणारी व्यक्तिरेखा साहित्यातून उभे वर्णन केले .ते जिवंत चित्र रमेश मोटे यांनी उभे केले . अध्यक्ष समारोप करताना प्राचार्य डॉ .मुकुंद देवर्षी म्हणाले की साहित्यात प्रचंड ऊर्जा शक्ती असते . लोकमान्य टिळकांचा राष्ट्रवादाचा राष्ट्रभक्तीचा धागा अण्णा भाऊंनी पुढे घेऊन गेले तसे नायक साहित्यातून उभे केले .ती राष्ट्रभक्तीची ज्योत आपण तेवत ठेवली पाहिजे . या महापुरुषाचा आदर्श पुढील पिढीसाठी दिला पाहिजे .असे विचार व्यक्त केले .या कार्यक्रमाचे प्रस्ताविक आभार प्रा . गौतम गायकवाड यांनी मांनले तर सूत्रसंचालन प्रा . जिजाराम कावळे यांनी केले .महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू भगिनी व विद्यार्थी बहुसंख्य करून उपस्थित होते .

## अखंड हरिनाम सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रम

अंबाजोगाई –प्रतिनिधी

संत शिरोमणी सावता महाराज समाधी उत्सव सोहळ्यानिमीत्त अंबाजोगाईच्या माळी नगर येथील संत सावता महाराज मंदिरात ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सुरू असून उमाकांत कुलकर्णी,विष्णु यिरळे, अंबादास चिक्षे,हनुमंत मुडेगांवकर, मुकूंदराज संस्थानचे अध्यक्ष किसन पवार आदींचे हरिकीर्तन पार पडले.अखंड हरिनाम सप्ताहात काकडा भजन विष्णु सहस्त्रनाम,गाथा भजन,श्री संत सावता महाराज चरित्र वाचन हरिकीर्तन,हरिजागर असे कार्यक्रम होत आहेत.



संतांनी निर्मिलेला वारकरी सांप्रदाय हाच जीवनाचा दिशादायी दिपस्तंभ असून याच मार्गाने मार्गक्रमण केल्यास जीवन सफल होते असे मत हरीभक्तीपर किर्तनातून किर्तनकारांनी व्यक्त केले.

रविवारी पंढरपुर येथील जगन्नाथ देशमुख यांच्या उपस्थितीत ह.भ.प. अच्युत महाराज जोशी यांच्या काल्याच्या किर्तनाने समारोप होणार आहे. या कार्यक्रमासाठी अमोल घोडके, बालासाहेब कुलकर्णी, दशरथ कदम,पद्माकर महामुनी, अनंत अंबेकर,दिलीप भांगडिया,व्यंकटेश दिंडोरे, प्रमोद आवाड, शुभम तिवारी, अंगद सावंत,दत्ता माले, रामकृष्ण माळी, बनेश्वर यादव कोष्टगावकर,विनोद निकम यांच्यासह अनेकजण परिश्रम घेत आहेत.

## वाघांबरे मॅडम आणि दीक्षित यांना सेवानिवृत्ती निमित्ताने निरोप मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार

**परळी । प्रतिनिधी**

औष्णिक विद्युत केंद्र परळी येथील संच क्रमांक ६ व ७ जलप्रक्रिया विभागातल्या उपकार्यकारी रसायनशास्त्रज्ञ तृप्ती वाघांबरे मॅडम व उपकार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असणारे प्रवीण दीक्षित यांना दि ३१ जुलै रोजी सायं ५ वा. प्रशासकीय कार्यालयातील सभागृहात सेवापूर्ती कार्यक्रम निरोप देण्यात आला. या सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांचा मुख्य अभियंता सुनिल इंगळे यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला.

सविस्तर माहिती अशी की,

प्रवीण दीक्षित यांनी परळी येथे संच क्र १ ते ८ तसेच चंद्रपूर वीज निर्मिती केंद्रातही आदी ठिकाणी उत्कृष्ट काम केले. तसेच जलप्रक्रिया विभागातल्या उपकार्यकारी रसायनशास्त्रज्ञ तृप्ती वाघांबरे मॅडम यांनी लॅब असिस्टंट म्हणून रुजू झाल्या



होत्या. त्यांचे शिक्षण . झाल्याने त्यांना कार्यालयीन पदोन्नती मिळत गेली. यांनी महानिर्मिती मध्ये सेवा दिली. या वेळी त्यांच्यावर बनवण्यात आलेल्या चित्रफीत दाखवण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता सुनिल इंगळे हे होते.

या वेळी प्रभारी उपमुख्य अभियंता हिम्मतराव अवचार, अधीक्षक अभियंता एस एन बुकतारे, राजीव रेड्डी, वरिष्ठ व्यवस्थापक (वित्त व लेखा) अरविंद येरणे, मानव संसाधन विभागाचे विलास ताटे, एम एम जाधव, महादेव वंजारे, व्यवस्थापक वैजनाथ कराड, कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ सतीश मुंडे, वरिष्ठ चेमिस्ट प्रभाकर चव्हाण, डॉ अरुण बागडे, कदम गुरुजी, प्रदीप चव्हाण, भगवान साकसमुद्रे,राजू गजले, कार्यकारी अभियंता ठोंबरे मॅडम, रत्नमाला देशमुख, विलास कुलकर्णी, यांच्यासह सेवानिवृत्त अधिकाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. ममता दीक्षित, साहिल दीक्षित, अक्षदा दीक्षित अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन के एच गित्ते मॅडम यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सहाय्यक कल्याणाधिकारी शरद राठोड यांनी मानले.

## संत सावता महाराज यांचे जन्मगावी अरणला सावतासृष्टी व भक्तनिवास साकारणार

### उपमुख्यमंत्री फडणवीस यांचे सह छगन भुजबळ,अतुल सावे यांचेसह संत- महंत राहणार उपस्थित

**बीड । प्रतिनिधी**

कांदा मुळा भाजी अवघी विठाबाई माझी म्हणनारे विठ्ठल भक्त तथा कर्मयोगी संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून जन्मगांवी अरण क्षेत्री सावता सृष्टी निर्माण कार्याचे व भाविकासाठी निवास व्यवस्थेसाठी अद्यावत भक्त निवास कार्याचे भुमिपुजन चार ऑगष्ट रोजी होणार असुन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अन्न व नागरी पूरवठामंत्री मा.छगन भुजबळ,इतरमागास व बहूजन कल्याणमंत्री,अतुल सावे यांचे सह आजी-माजी आमदार व संत महंताची मांदियाळी उपस्थित राहणार असुन या नयनरम्य भक्तिसोहळयाचे साक्षीदार होण्यासाठी शिरूर तालुक्यात गावोगांवी निमंत्रण अभियान सुरू असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी दिली आहे .

वैष्णवांच्या मांदियाळीत विठ्ठलाला जेऊ घालणारे संत नामदेव महाराज,रेड्यामुखी वेद बोलवणारे ज्ञानोबा त्यांचे गुरू निवृत्ती महाराज ,सदेह वैकुंठाला



सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांचे जिल्हाभर निमंत्रण अभियान

जाणारे तुकोबा , तुकोबाला वैकुंठाहून परत आणनारे निळोबा,हाडातूनही विठ्ठल म्हणवाणारे चोखोबा,कच्च पक्के ठरवणारे गोरोबा,जो जो जयाचा घेतला गुण तो तो मी गुरू केला जान म्हणवणारे एकनाथ महाराज ,कठोठी मे गंगा दावणारे रोहिदास ,कर्ममेळा,ज्याच्या गोव-या देखील विठ्ठल विठ्ठल म्हणाल्या त्या जनाबाई , ज्ञानोबाची बहिण ताटीच्या अभंगातून ज्ञानोबाला संतत्वाची जाणीव करून देणारी मुक्ताबाई असे एक ना अनेक संत अवतरीत झाले याच काळखंडात अरण या गावांत आमुची माळीयाची जात शेत लावू बागायत ,कांदा मुळा भाजीतच विठुरायाचे दर्शन घेणारे आणि हृदयात विठ्ठल साठवलेले कर्मयोगी संत सावता महाराज यांचा अवतार झाला,जवळच असलेल्या पंढरपुरला न जाता विठूरायालाच आपल्या मळ्यात येण्यास भाग पाडले असे त्यांचे अलौकिक महत्व आहे.आजही हजारो भाविक अरण क्षेत्री सावता महाराज यांचे दर्शनाला जात असतात,त्यांची पुण्यतिथी चार ऑगष्ट रोजी होत असुन शासनाच्या योजनेतून संत सावता सृष्टी साकारली जात आहे ही बाब निश्चितच सावता भक्तासाठी आनंद द्विगुणीत करणारी आहे .

गावोगांवी संत सावता महाराज यांचे पुण्यतिथी निमित्त विविध धार्मीक कार्यक्रम होत असतात.आपल्या वाट्यावर आलेले कर्म अगदी प्रामाणीकपणे करत विठ्ठल चरणी समर्पित केल्यास ती देखील भक्तिच ठरते असा संदेश देणारे संत सावता महाराज यांचे जन्मगांव तिर्थक्षेत्र आहेच या क्षेत्राला अधिक सौंदर्य बनवण्यासाठी आता सावता सृष्टी साकारणार असुन भुमिपुजन होणार आहे.या सोहळ्यास सर्वच कर्मप्राधान्य विठ्ठल व संत सावता भक्तांनी उपस्थित राहवे असे निमंत्रण गावोगांवी जाऊन सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी दिले आहे.यामधे बीडसह परळी,शिरूर कासार,राजूरी,पाटोदा,अ ाष्टी,मुर्शदपूर, हिवरसिंगा, ब्र.येळंब, खालापुरी, माळेवाडी, रुपूर,खोपटी,मानूर आदी ठिकाणी जाऊन निमंत्रण दिले आहे ,हे निमंत्रण सर्वांना पोहच करण्याचे पवित्र काम सुरूच आहे.

## संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त रक्तदान शिबीरात ७० जणांचे रक्तदान

**परळी । प्रतिनिधी**

संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह सुरु असुन या निमीत्त बुधवार दि.१ ऑगस्ट रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या रक्तदान शिबीरात ७० रक्तदात्यांनी रक्तदान केले.विशेष म्हणजे या रक्तदान शिबीरात महिलांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदान केले.

संत सावता महाराज समाधी सोहळ्यानिमीत्त परळी येथील संत सावतामाळी मंदिरात दि.२८ जुलै पासुन अखंड हरिनाम सप्ताह सुरु आहे.या सप्ताहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार,संत नामदेव महाराज समाधी सोहळा आदी सामाजीक,धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या अंतर्गत बुधवार दि.१ ऑगस्ट रोजी परळी येथील वैद्यनाथ ब्लड बँकेसाठी रक्तदान शिबीर घेण्यात आले.सकाळी ११ वाजता सुरु झालेल्या या शिबीरात सायंकाळी पाच वाजेपर्यंत ७० जणांनी रक्तदान केले.यात प्रविण काळे,दत्ता लोखंडे, नेताजी



लोखंडे,किशोर वडूळकर,भाविद लोखंडे,जगन्नाथ वडुळकर,चंद्रशेखर काळे,अमोल काकडे,रवी गव्हाणे,लखन गव्हाणे, सतीष हारकळ,सोहम पवार,मुंजा धुमाळ,नरहरी पाथरकर,दत्ता कोरे, सचिन गोरे,गजानन वाघमारे, बालासाहेब काळे,सौ.सुनिता सातपुते,सौ.रुपाली लोखंडे,सौ.उषा लोखंडे,सौ.जयश्री लोखंडे,सौ.संगीता शिंदे,सौ.राजकन्या डाके,सौ.ऐश्वर्या सुर्यवंशी,देवई गडगीळे,सौ.वर्षा बनसोडे,कु .तेजस्वीनी बनसोडे,सौ.वृशाली नवाले,सौ.रेणुका डाके,सौ वैष्णवी लोखंडे,सौ.मिरा लोखंडे,सौ.बबीता शिंदे,सौ,प्रमिला नाईकवाडे,सौ.रेखा लोखंडे,दत्तात्रय शिंदेसौ.अनिता माळी,अनिता लोखंडे,राजेश लोखंडे,बालासाहेब राउत,नारायण भोकरे,ज्ञानेश्वर खेत्रे,प्रसाद डाके,दशरथ गोरे,अमोल गायकवाड,प्रकाश लोखंडे,गणेश राऊत,अर्जुन खरोळकर,रवी कानडे,हनुमान बनसोडे,विलास लोखंडे,शिवाजी बनसोडे,गोपीनाथ डाके,अजय बनसोडे,शाम डाके,सुनिल देशमुख,भगवान जायम्हेत्रे,ज्ञानेश्वर लोखंडे,अशोक राऊत,सतीश लोखंडे,बंडू लोखंडे,बद्रीनाथ लव्हाळे,सचिन खेत्रे,अभिषेक खोसे आदींनी रक्तदान केले.

# टोमॅटोचे दर कमी करण्यासाठी सरकारचे प्रयत्न ; तरीही टोमॅटो १०० रुपयावर

पुणे : सध्या टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांसाठी चांगले दिवस आहेत. कारण सातत्यानं टोमॅटोच्या दरात वाढ होत असल्याचं पाहायला मिळत आहे. याचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. मात्र, दुसरीकडे ग्राहकांच्या खिशाला वाढत्या दराचा फटका बसत आहे. दरम्यान, एका बाजूला सरकारनं कमी दरात टोमॅटोची विक्री सुरु करुन देखील दिल्लीत टोमॅटोच्या दरात वाढ होतेय. दिल्लीत सध्या टोमॅटोचे दर हे १०० रुपयांच्या पुढे गेले आहेत.

टोमॅटोचे भाव आधीच गगनाला भिडले आहेत, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने काही शहरांमध्ये सवलतीच्या दरात टोमॅटोची विक्री सुरू केली आहे. असे असले तरीदेखील दरात वाढ होताना दिसत आहे. हवामानाचा मोठा फटका टोमॅटो पिकाला बसला आहे. देशातील विविध भागात मुसळधार पाऊस सुरु आहे. यामुळं वाहतूक विस्कळीत झाली आहे. तर दुसरीकडे पिकाचं मोठं नकसान झालं आहे. त्यामुळं टोमॅटोच्या दरात मोठी वाढ होत आहे. पुढच्या काळात आणखी टोमॅटोच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. हिमाचल प्रदेशातील मुसळधार पावसाचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या खिशावर होऊ शकतो. त्यामुळ त्यांच्या स्वयंपाकघरातील बजेट विस्कळीत होऊ शकते. हिमाचल प्रदेशातील पावसामुळं राष्ट्रीय राजधानी दिल्लीत टोमॅटोचे किरकोळ भाव पुन्हा एकदा १०० रुपये प्रतिकिलोच्या आसपास आहेत. दिल्लीत टोमॅटोच्या दराने यंदाच्या हंगामात एकदा शतक गाठले आहे. गेल्या महिन्यात दिल्लीच्या किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर १०० रुपये ते १२० रुपये किलोवर पोहोचले होते. दिल्लीतील मदर डेअरीच्या सफाल या दुकानात टोमॅटो १०० रुपये किलो दराने विकला जात होता. त्याचवेळी सफाल आउटलेट्स व्यतिरिक्त असंघटित किरकोळ बाजारात टोमॅटोचे दर १०० ते १२० रुपये किलोपर्यंत पोहोचले होते.



सरकारच्या प्रयत्नांमुळे टोमॅटोचे भाव आटोक्यात येण्यास मदत झाली. सरकारने सारख्या सहकारी संस्थांच्या मदतीने दिल्लीत अनेक ठिकाणी अनुदानित दरात टोमॅटो उपलब्ध करुन देण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळं भाव काही प्रमाणात खाली आले. सरकारी आकडेवारीनुसार, सध्या दिल्लीत टोमॅटोचे किरकोळ दर ७० रुपये प्रति किलोच्या आसपास आहेत, तर आर्थिक राजधानी मुंबईत किरकोळ किंमत ८० रुपये प्रति किलो आहे. नॅशनल को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन ऑफ इंडिया दिल्लीतील अनेक ठिकाणी टोमॅटो ६० रुपये प्रति किलो या सवलतीच्या दराने विकत आहे. एनसीसीएफच्या पुढाकारामुळे किंमती आटोक्यात आणल्या जात आहेत. मात्र, पावसामुळे भाव पुन्हा १०० रुपयांच्या पुढे जाण्याचा धोका आहे. टोमॅटो लवकरच पुन्हा शतक ठोकेल अशी भीती व्यापाऱ्यांना आहे.

### मागील वर्षी टोमॅटोचा दर ३५० रुपयांवर

मागील वर्षा या महिन्यांत टोमॅटोच्या दरात वाढ दिसून येत होती. गतवर्षी परिस्थिती खूपच बिकट झाली होती, किरकोळ बाजारात टोमॅटोचा भाव ३५० रुपये किलोवर पोहोचला होता. त्यानंतर सरकारने सहकारी संस्थांच्या मदतीने अनेक शहरांमध्ये सवलतीच्या दरात टोमॅटोची विक्री सुरू केली.

## कडधान्यांची आयात ९० टक्यांनी वाढून ४.७ दशलक्ष टन झाली

पुणे : देशांतर्गत कडधान्याची मागणी पूर्ण करण्यासाठी भारतातील डाळींची आयात २०२३-२४ या वर्षात ९० टक्क्यांनी वाढून ४७.३८ लाख टन झाली, अशी माहिती सरकारने संसदेत दिली. २०१५-१६ मध्ये डाळींचे अखिल भारतीय उत्पादन १६३.२३ लाख टनांवरून २०२३-२४ मध्ये २४४.९३ लाख टन इतके वाढले आहे असे कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर यांनी लोकसभेच्या लेखी उत्तरात सांगितले.

२०२१-२२ मध्ये डाळींची आयात २६.९९ लाख टन होती, तर निर्यात ३.८७ लाख टन होती. २०२२-२३ मध्ये डाळींची आयात २४.९६ लाख टन होती, तर निर्यात ७.६२ लाख टन होती. २०२३-२४ मध्ये डाळींची आयात ४७.३८ लाख टन होती आणि निर्यात ५.९४ लाख टन होती. गेल्या दहा वर्षांत म्हणजे २०१४-१५ ते २०२३-२४ (तृतीय आगाऊ अंदाजानुसार), एकूण डाळी आणि तेलबियांचे उत्पादन अनुक्रमे ४३ टक्के आणि ४४ टक्क्यांनी वाढले आहे, असे ठाकूर म्हणाले.

केंद्र सरकारने देशाला कडधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण करण्याचे ध्येय ठेवले आहे. त्या दृष्टीने योग्य ते पाऊल उचलले जात आहे. यात डाळ ग्राम योजनेचा सुद्धा समावेश आहे. चांगल्या दर्जाच्या बियाण्यांच्या उपलब्धतेसाठी, भारत सरकारने १५० डाळ बियाणी केंद्र उघडली असून आणि कमी उत्पादकता असलेल्या जिल्ह्यांमध्ये आयसीएआरद्वारे विभागवार प्रात्यक्षिके दिली गेली आहेत. डाळींच्या उत्पादनात स्वयंपूर्णता आणण्यासाठी व पीकवैविध्य राखण्याची खबरदारी घेण्यासाठी, किमान आधारभूत किंमत अर्थात हमीभावाने तूर, उडीद आणि मसूर खरेदी करण्यास केंद्र सरकार वचनबद्ध आहे, असे प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण तथा ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी नुकतेच केले आहे. मूग आणि चणा यांच्या उत्पादनात देश स्वयंपूर्ण झाले आहे. गेल्या दहा वर्षांत या धान्याच्या आयातीवरील अवलंबित्व ३० टक्क्यांवरून १० टक्क्यांवर आणण्यात देशाला यश आले आहे. तरीही अजूनही काही कडधान्याच्या उत्पादनात वाढ करणे गरजेचे आहे असे लक्षात येते.



## पावसाळ्यात शेळ्या, मेंढ्याचे व्यवस्थापन



पावसाळ्यात जनावरांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणगरजेचे असते, कारण या काळात जनावरांना जंतूसंसर्ग किंवा पोषणा अभावी विविध प्रकारचे आजार होत असतात. वेळीच उपाय केल्यास होणारे नुकसान टाळता येते. यात प्रामुख्याने शेळ्या, मेंढ्याची निगा राखणे महत्त्वाचे ठरते.

पावसाळ्यातील शेळ्यांचे व्यवस्थापन : शरीरावरील परजीवींच्या वाढीकडे लक्ष द्यावे. नवीन करडांचे जंत निर्मूलन करावे. सर्व शेळ्यांचे आंत्रविषार, पी. पी. आर., धनुर्वातासाठी लसीकरण करून घ्यावे.

पैदासक्षम शेळ्यांना खुराक वाढवा. पैदाशीच्या बोकडांची पैदाशीसाठी तयारी करावी. जर एकावेळी शेळ्यांना गाभण घालायचे असेल तर माज ओळखण्यासाठी माज ओळखणारा बोकड गोठ्यात ठेवावा.

पावसाळ्यातील मेंढ्यांचे व्यवस्थापन : पशु वैद्यकाच्या सल्ल्याने कळपातील मेंढ्यांची लाल लघवीचा आजार व कावीळ या रोगाची तपासणी करून उपचार करावे. मेंढ्यांना शिफारसीनुसार जंताचे औषध उपचार करावेत. गाभण मेंढ्याची विशेष काळजी घ्यावी. १ ते १२ महिने वयाच्या कोकरांचे शारीरिक वजन करून घ्यावे. सर्व मेंढ्यांना धनुर्वात रोगाचे लसीकरण करून घ्यावे.


इतर जनावरांची काळजी : गोठ्यामध्ये काही ठिकाणी पाणी गळत असेल तर वेळीच डागडुजी करावी. गोठ्यात हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी. गोठ्यामध्ये स्वच्छता ठेवावी, जेणेकरून लघवी व शेणावाटे निघणारे अमोनियम मिथेन वायूमुळे जनावरांच्या डोळ्यांना त्रास होणार नाही. वारा, थंडीपासून बचाव करण्यासाठी योग्य निवारा, गाभण गाई, म्हशींची योग्य व्यवस्था, आरामदायी व उबदार बसण्याची सुविधा तसेच शक्य तेवढे कोरडे वातावरण या काळात ठेवावे.

पावसाळ्यात जमीन ओली, भुसभुशीत झाल्यामुळे जनावर घसरून त्यांना इजा होऊ शकते. दगड व माती खूरांमध्ये जाऊन बसल्यामुळे जनावरांना जखमा होतात. यासाठी खूरांची नियमित तपासणी करावी. पावसाळ्यात ओलसरपणामुळे खूर खराब झाल्यास त्या वेदनांमुळे दुभत्या गाई, म्हशींच्या उत्पादनावर परिणाम होतो. हिरव्या चाऱ्याकरिता ज्वारी, बाजरी, मका, यासारखे पिकांना प्राधान्य द्यावे. याबरोबर बहुवार्षिक पिकांमध्ये यशवंत, मेथी घास यासारखी पिके घ्यावीत.

## केळीवरील कुकुंबर मोझॅक रोगाचे नियंत्रण

केळी पिकावर विषाणूजन्य रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असतो. बदलते वातावरण आणि ढगाळ हवामान यामुळे रस शोषणाऱ्या किडी चा प्रादुर्भाव जास्त दिसून येतो. गेल्या २-३ वर्षांपासून केळीवर ककुंबर मोझॅक विषाणू (सी.एम.व्ही.) प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून येत आहे. स्थानिक भाषेत या रोगास 'हरण्या' असे म्हटले जाते. या रोगाच्या प्रादुर्भावामुळे केळी उत्पादनात मोठी घट येते. विषाणूजन्य रोगाचे नियंत्रण करणे शक्य नसले तरी रोगाचा प्रादुर्भाव टाळणे आणि प्रसार रोखणे शक्य आहे. यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब फायदेशीर ठरतो.

अनुकूल घटक : सततचे ढगाळ वातावरण, सतत पाऊस, कमी तापमान, जास्त आर्द्रता हे घटक रोगाच्या वाढीसाठी पोषक ठरतात. यासोबतच रोगयुक्त लागवड साहित्य, तन नियंत्रणाचा अभाव, अन्नद्रव्यांची कमतरता हे घटक रोगाच्या प्रादुर्भावास कारणीभूत आहेत. रोगाचा प्राथमिक प्रसार लागवड साहित्य मार्फत आणि दुय्यम प्रसार 'मावा' किडी मार्फत होतो. या विषाणूची जवळपास ८०० ते १००० यजमान पिके आहेत. यात काकडी, भोपळा, कारली, दुधीभोपळा, गिलके, चवळी, टोमॅटो, वांगी, मिरची तसेच एकदल व द्विदल पिकांचा समावेश होतो. पीक फेरपालट पद्धतीचा अभाव हे देखील प्रमुख कारण आहे.



लक्षणे : सुरुवातीला कोवळ्या पानांवर हरितद्रव्य विरहित, पिवळसर पट्टे दिसतात. हे पट्टे तुटक किंवा संपूर्ण पानावर आढळून येतात. एका पानावर १ ते २ अर्धवट आकाराचे किंवा पूर्ण पानभर पसरलेले पट्टे दिसतात. कालांतराने पानाचा पृष्ठभाग आकसला जाऊन कडा वाकड्या होतात. पानांचा आकार लहान होतो. नवीन येणारी पाने आकाराने लहान होतात. पानाच्या देठाची लांबी कमी होऊन पाने जवळ येतात. पानांच्या शिरा ताठर होऊन संपूर्ण पान कडक होते. पान हाताने दाबल्यास कडकड आवाज होतो. पानांच्या शिरांमधील भाग काळपट पडून तेथील उती मरतात. पाने फाटतात. प्रादुर्भाव जास्त झाल्यास, पाने पिवळी पडून पोंगा सडतो. झाडांची वाढ खुंटते. प्रादुर्भावग्रस्त झाडांची निसवण उशिरा तसेच अनियमित होऊन फण्या अत्यंत लहान होतात. फळे विकृत आकाराची होऊन त्यावर पिवळ्या किंवा काळ्या रंगाच्या रेषा दिसतात. अशी विक्रीसाठी योग्य नसतात.

नियंत्रण : केळीची बाग व्हायरस मुक्त ठेवण्यासाठी मशागतीच्या पद्धती व व्हेक्टरचे नियंत्रण महत्वाचे आहे. केळी लागवडीसाठी रोग मुक्त व व्हायरस इंडेक्सिंग केलेल्या टिश्यू कल्चर रोपांची लागवड करावी. बाग तण मुक्त ठेवावी कारण अनेक तणे रोगाची जोपासना करतात. बागे शेजारी मका, कापुस, चवळी, काकडी, घोसाळे, टोमॅटो, टरबुज, मिरची, ऊस या सारख्या पिकांची लागवड करु नये. जुलै, ऑगस्ट,सप्टेंबर, नोव्हेंबर व डिसेंबर च्या लागवडीवर सीएमव्ही रोग येण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे या लागवडीची विशेष काळजी घ्यावी. रोगांचा प्रसार करणाऱ्या रसशोषक क़िडींचा वेळीच बंदोबस्त करणे गरजेचे आहे. सीएमव्ही रोगग्रस्त झाडातुन व्हायरस मुक्त होऊ शकत नाही त्यामुळे रोगग्रस्त झाडे उपटून टाकावी. क्लोरोपायरीफॉस, टर्मिनेटर, ॲग्रोसिस, ४५ मिली + निमअर्क ५० मी + स्टिकर २५ मिली १५ लि. पाण्यात किंवा असिटामॅप्रिड, धनप्रीत, धानुका, ६ ग्रॅम + निमअर्क ५० मी + स्टिकर २५ मिली १५ लि. पाण्यात घेवून आठवड्याच्या अंतराने फवारणी करावी.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४९२ : इटालियन खलाशी ख्रिस्तोफर कोलंबस हे आपल्या तीन जहाजांसह स्पेनहून भारताच्या शोधात निघाले.
१७८३ : जपानमधील माउंट असामा ज्वालामुखीचा उद्रेक होऊन सुमारे ३५,००० जण मृत्यूमुखी पडले.
१८११ : जंगफ्राऊ शिखर या बर्नीज आल्प्स पर्वतरांगेतील तिसरे सर्वोच्च शिखराची जोहान रुडॉल्फ आणि हायरोनिमस मेयर यांनी पहिली चढाई केली.
१९०० : 'द फायरस्टोन टायर अँड रबर कंपनी' ची स्थापना झाली.
१९१४ : बव्हेरियाचे राजे लुडविक यांच्याकडे आपणांस सैन्यात दाखल करून घ्यावे असा हिटलरने अर्ज केला आणि त्याची सैन्यात नियुक्तीझाली.
१९३६ : आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक ही स्पर्धा आयोजित करणार्या 'महाराष्ट्रीय कलोपासक' या संस्थेची हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्था सुरू झाली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार या संस्थेचे पहिले अध्यक्ष झाले.
१९४६ : सांताक्लॉज लँड, थीम पार्क जगातील पहिले थीम पार्क सांताक्लॉज, इंडियाना, अमेरिका येथे उघडले.
१९४८ : भारतीय अणूऊर्जा आयोगाची स्थापना झाली.
१९६० : नायजरला (फ्रान्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९७७ : -८० कॉम्पुटर टँडी कॉर्पोरेशन कपंनीने जगातील पहिल्या मोठ्या प्रमाणात विकलेल्या वैयक्तिक संगणकांची घोषणा केली.
१९८५ : प्रसिद्ध भारतीय समाजसेवक व सक्रीय कार्यकर्ते बाबा आमटे यांना सार्वजनिक सेवेसाठी रॅमन मॅग्सेसे पुरस्कार प्रदान करण्यात आला.
१९९४ : सहज सोप्या व गोड कविता आणि सूक्ष्म व मार्मिक वर्णनात्मक लेख यांद्वारे हिन्दी साहित्याची अमूल्य सेवा करणारे डॉ. हरिवंशराय बच्चन यांना उत्तर प्रदेश सरकारतर्फे विषेश पुरस्कार जाहीर.
१९९४ : संगीतकार अनिल विश्वास यांना मध्य प्रदेश सरकारचा 'लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९७ : स्काय टॉवर, ऑकलंड, न्यूझीलंड या दक्षिण गोलार्धातील सर्वात उंच फ्री-स्टँडिंगइमारतीचे उदघाटन.
२००० : मल्याळी दिग्दर्शक शाजी एन. करुण यांना फ्रेन्च सरकारने 'नाईट ऑफ आर्टस अँड लेटर्स' पुरस्काराने सन्मानित केले.
२००४ : राज्यपाल महंमद फझल यांच्या हस्ते सोलापूर विद्यापीठाचे औपचारिक उद्घाटन झाले. १ ऑगस्ट २००४ रोजी या विद्यापीठाची स्थापनाझाली होती.
२००४ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने आपला मैसेंजर हा उपग्रह बुध ग्रहाकडे प्रक्षेपित केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८६ : मैथिलिशरण गुप्त हिन्दी कवी. त्यांचे सुमारे ४० स्वतंत्र ग्रंथ आणि ६ अनुवादित ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांच्या 'भारतभारती' या काव्यग्रंथामुळे त्यांना राष्ट्रकवी म्हणून मान्यता मिळाली. (मृत्यू: १२ डिसेंबर १९६४)
१८९८ : उदयशंकर भट्ट आधुनिक हिंदी नाटककार, एकांकिकाकार, कवी आणि कादंबरीकार. त्यांनी पंजाब विद्यापीठातून'शास्त्री' आणि कलकत्ता विद्यापीठातून 'काव्यतीर्थ' या उपाध्या मिळवल्या. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९६६)
१९०० : क्रांतिसिंह नाना पाटील स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, 'पत्री सरकार'चे (प्रति सरकार) संस्थापक आणि कम्युनिस्ट पक्षाचे खासदार (मृत्यू: ६ डिसेंबर १९७६)
१९१६ : शकील बदायूँनी गीतकार आणि शायर (मृत्यू: २० एप्रिल १९७० मुंबई)
१९२४ : लिऑन युरिस अमेरिकन कादंबरीकार (मृत्यू: २१ जून २००३)
१९३६ : पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या घराण्यातील शास्त्रीय ठुमरी गायक पंडित छन्नूलाल मिश्रा यांचा जन्मदिन.
१९३७ : फ्रेंच ओपन ग्रँड स्लॅम स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे विजेता स्पॅनिश टेनिसपटू आंद्रेस गिमेनो टोलागिरा यांचा जन्मदिन.
१९३९ : भारतीय क्रिकेटपटू अपूर्व सेनगुप्ता यांचा जन्म.
१९५६ : बलविंदरसिंग संधू १९८३ च्या क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघातील क्रिकेटपटू
१९६० : भारतीय क्रिकेटपटू गोपाल शर्मा यांचा जन्म.
१९८४ : सुनील छेत्री पद्मश्री व अर्जुन पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय व्यावसायिक फुटबॉलपटू व कर्णधार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९२ : औद्योगिक क्रांतीच्या काळातील अग्रणी इंग्रज शोधक व उद्योजक रिचर्ड आर्कराईट यांचे निधन.
१९०८ : पटना येथील खुदाबक्श ग्रंथालयाचे संस्थापक मौलवी खुदाबक़्श खान यांचे निधन.
१९२९ : फोनोग्राफ चे शोधक एमिल बर्लिनर यांचे निधन. (जन्म: २० मे १८५१)
१९३० : व्यंकटेश बापूजी केतकर विख्यात गणिती व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्योतिर्विद (जन्म: १२ जानेवारी १८५४)
१९५७ : देवदास गांधी पत्रकार, 'हिन्दुस्तान टाइम्स'चे संपादक, महात्मा गांधींचे चिरंजीव (जन्म: २ आक्टोबर? १९०० दरबान, दक्षिण अफ्रिका)
१९९३ : स्वामी चिन्मयानंद सरस्वती भारतीय हिंदू अध्यात्म नेते आणि अद्वैत वेदांत, भगवद्गीता, उपनिषद प्रसारक (जन्म: ८ मे १९१६)
१९९३ : उत्तरप्रदेश मधील हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे सक्रीय सदस्य व क्रांतिकारक राम प्रसाद बिस्मिल यांचे निकटवर्तीय प्रेम किशन खन्ना यांचे निधन.
२००७ : सरोजिनी वैद्य लेखिका (जन्म: १५ जून १९३३)
२०२० : जॉन ह्यूम आयरिश राजकारणी नोबेल पुरस्कार (जन्म: १८ जानेवारी १९३७)

# पालकमंत्र्यांकडून बीड शहरवासीयांची दिशाभूल- मा.आ.सय्यद सलीम

## बीड शहराच्या पाणी पुरवठा प्रकरणी हायकोर्टाचा आदेश डावलून राजकारण केले

बीड । प्रतिनिधी

पाणी असुनही आणि पाणी पुरवठ्याची योजना पुर्ण होवूनही केवळ वीज बिलाच्या थकबाकीपोटी बीडकरांना पाणी मिळत नाही. त्यामुळे वीजबिल भरण्यासंदर्भात शासनस्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करूनही दखल घेतली जात नसल्याने माजी आ.सय्यद सलीम यांनी केंद्राच्या 'हर घर जल, हर घर नल' या महत्वकांक्षी अशा जलजीवन मिशनच्या योजनेला हायकोर्टात आव्हान देत याचिका दाखल केली होती. या प्रकरणामध्ये हायकोर्टाने ११ जून २०२४ रोजी, राज्याच्या नगर विकास विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना सर्व संबंधितांची बैठक दि.२९ जुलै रोजी घेण्याचे आदेशित केले होते. मात्र ही बैठक रद्द करून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी ३१ जुलै रोजी व्ही.सी.द्वारे या मुद्यावर बैठक घेतली. मात्र या बैठकीत हायकोर्टाचा मुद्दा इतरत्र वळवत वांझोटी बैठक घेवून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पाणी प्रश्नावर तीन लाख नागरीकांची दिशाभूल करत राजकारण केल्याचा आरोप माजी आ.सय्यद सलीम यांनी केला आहे.

बीडचे माजी आ.सय्यद सलीम यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या पाणी प्रश्नाच्या बैठकीवरून वस्तुस्थिती दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. बीड नगर पालिकेकडे महावितरणची ३६ कोटी रूपयांची थकबाकी आहे. त्यामुळे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी २५ एमएलटी क्षमता असलेली पाणी पुरवठा योजना मंजुर असुनही त्यास महावितरणकडून अतिरीक्त वीज कनेक्शन मिळत नाही. यामुळेच सध्या पाणी असुनही शहरात कुठे दहा - बारा दिवसाला तर कुठे पंधरा ते वीस दिवसाला पाणी पुरवठा होत आहे. सदरील मुद्यावरून माजी आ.सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहीत याचिका दाखल केली होती. त्यांच्या याचिकेची दखल घेवून न्यायालयाने दि.११ जुन २०२४ रोजी बीड नगर पालिकेकडील वीज बील थकबाकीच्या विषयावर नगर विकास विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांना बैठक घेण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाच्या आदेशानुसार ही बैठक दि.२९ जुलै २०२४ रोजी होणे नियोजीत होते. ही बैठक अचानक रद्द करून आ.संदीप क्षीरसागर आणि याचिकाकर्ते माजी आ.सय्यद सलीम यांना श्रेय जावू नये म्हणून पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी हीच बैठक दि.३१ जुलै रोजी व्हिडीओ कॉन्फरंसींग द्वारे घेतली. या बैठकीतून निष्पन्न काहीच झाले नाही. केवळ इतरांना श्रेय नको म्हणून ओढून - ताणून ही बैठक घेण्यात आली. त्यातही जनहित याचिकेच्या अनुषंगाने हायकोर्टाने जे आदेश दिले आहेत. त्या आदेशाला बगल देवून ऐनवेळी विषय इतरत्र वळविण्यात आल्याचा आरोप माजी आ.सय्यद सलीम यांनी केला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने या पाणी प्रश्नावर प्रस्ताव तयार करून तो केंद्रातून जलजीवन मिशन योजनेशी संबंधीत विभागाला पाठवणे आवश्यक होते. मात्र दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याचे आश्वासन देण्यापलीकडे पालकमंत्र्यांनी या बैठकीत काहीच ठोस निर्णय घेतले नाहीत. हा विषय दोन्ही उपमुख्यमंत्र्यांकडे बैठक घेण्याचा नसुन प्रशासकीय स्तरावर संबंधीत विभागाच्या अधिकार्यांच्या उपस्थितीत बैठक घेवून त्याचा प्रस्ताव केंद्राच्या जलजिवन मिशन योजनेशी संबंधीत विभागाकडे पाठवणे आवश्यक होते. परंतू केवळ राजकारण करायचे म्हणून जाणिवपूर्वक विषय इतरत्र वळवून बैठक घेण्यात आलेल्याचे माजी आ.सय्यद सलीम यांनी सांगितले.



राजकारण करण्याचा प्रयत्न

बीड शहराच्या पाणी पुरवठा प्रश्नावर सत्ताधाऱ्यांची उदासीनता असल्याने माजी आ.सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल केली होती. यावर दि.११ जून २०२४ रोजीच्या सुनावणीत, केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाच्या जलजीवन मिशन योजनेतून निधीची तरतूद करण्यात यावी असे आदेशीत केले होते. तसेच गरज पडल्यास राज्य शासन, जिल्हा नियोजन समितीचा निधी व खासदार आणि आमदार फंडातून निधीची तरतूद करण्याचे आदेश दिले होते. याबाबत २९ जुलै २०२४ रोजी मंत्रालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. दरम्यान सदरील बैठक अचानक रद्द करण्यात आली. परंतु या महत्त्वाच्या विषयावर सय्यद सलीम यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे बीडचा पाणी प्रश्न मार्गी लागेल आणि याचे श्रेय सय्यद सलीम आणि आ.संदीप क्षीरसागर यांना जाईल या भीतीने उच्च न्यायालयाच्या आदेशांना बगल देत बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी या संदर्भात ३१ जुलै २०२४ रोजी व्हीडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे बैठक घेतली. यावेळी या विषयात उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संबंधित अधिकारी यांची बैठक घेऊन या संदर्भात प्रस्ताव तयार करून केंद्रीय जलजीवन मिशन योजनेच्या, जलशक्ती मंत्रालयाकडे पाठवणे गरजेचे होते. परंतु याकामाचे श्रेय दुसर्यांना जाईल म्हणून या बैठकीत हा विषय जाणीवपूर्वक इतरत्र वळविला गेला.

## थोडक्यात



### दिलीप मिसाळ यांचा सेवानिवृत्त सोहळा

रायमोहा : शिरूर कासार तालुक्यातील खोकरमोहा येथील रहिवाशी तथा पिंपळनेर ग्रामपंचायतचे अभ्यासू कर्तव्यदक्ष ग्रामसेवक दिलीपराव मिसाळ साहेब हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यांचा सेवापुर्ती सन्मान सोहळा शिरूर कासार पंचायत समिती सभागृहात संपन्न झाला व्यासपीठावर बी डी ओ संजय केंद्रे साहेब,विस्तार अधिकारी शिंदे साहेब, जावळे साहेब ,श्रीमती गोरे सेवानिवृत्त ग्रामसेवक मारोती नाना मिसाळ,उपस्थितीत होते त्याप्रसंगी शिरूर कासार तालुका ग्रामसेवक संघटनेच्या वतीने सर्व ग्रामसेवकांनी व पंचायत समिती कार्यालयाच्या वतीने ग्रामसेवक दिलीपराव मिसाळ साहेब यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष अशोक मिसाळ,जिल्हा उपाध्यक्ष दिलीप मिसाळ,सचिव गाडेकर साहेब व सर्व ग्रामसेवक पंचायत समितीचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थितीत होते तसेच सामाजिक कार्यकर्ते गोकुळ सानप, रायमोहाकर व पिंपळनेरचे सरपंच मिठ्ठु जायभाये ,सोमनाथ जायभाये यांच्या वतीनेही ग्रामसेवक दिलीपराव मिसाळ यांचा सत्कार करण्यात आला शेवटी सर्वांचे आभार ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष अशोक मिसाळ यांनी मानले

### ॲड. प्रकाश आंबेडकरांची सोमठाणा येथे धावती भेट



माजलगाव : वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा डॉ.प्रकाश आंबेडकर यांच्या वतीने औरंगाबाद येथून सुरू करण्यात आलेल्या आरक्षण बचाव यात्रेनिमित्त ॲड.आंबेडकरांनी माजलगाव तालुक्यातील सोमठाणा या गावी धावती भेट दिली.यावेळी त्यांनी सरवर पिंपळगाव,सोमठाणा,गंगामसला आणि अडोळा येथील नागरिकांना थोडक्यात मार्गदर्शनही केले. यावेळी त्यांच्यासोबत सरपंच जबीउल्ला पठाण,वंचितचे सर्कल अध्यक्ष सुरेश मस्के,ग्रामपंचायत सदस्य सतीश पवार,शाखाध्यक्ष जावेद मिर्झा बेग, राजेश डोंगरे,बाबासाहेब भालेराव,डी.एल.भालेराव,उपसरपंच अनवर शेख,अतुल भालेराव,उत्तम भालेराव,रतन भालेराव,बबन भालेराव इत्यादीसह शेकडो समाज बांधवांची उपस्थिती होती.

### साबलखेड येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

कडा : आण्णाभाऊ साठे जयंती निमीत्त साबलखेड येथील जि.प.प्राथमिक शाळेमधील



विद्यार्थ्यांना साबलखेड लहूजी ग्रुप तर्फे इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करुन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केलेले कार्य धानोरा केंद्राचे केंद्रप्रमुख जावेद पठाण यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. या प्रसंगी सरपंच शिवाजी बुरंगुले,उपसरपंच शरद देसाई,ग्रां.पं.सदस्य लखन साबळे,शालीय समितीचे अध्यक्ष मल्हारी गाडे,तसेच मुख्याध्यापक श्रीमती आढाव मॅडम,धांडे मॅडम,सय्यद मॅडम,औटे सर,चिंमटे मॅडम,तसेच जय लहूजी ग्रुपचे नितीन साबळे,सतिष साबळे,दिपक साबळे, आशोक साबळे, कृष्णा साबळे, शिवम आडगळे, सुरज साबळे, महेश साबळे,जयंती निमित्त उपस्थित होते.

## अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिध्द साहित्यिक प्रा.गोरे यांच्या हस्ते

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने १७ वे अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनाचे १८ ऑगस्ट २०२४ रोजी वर्धा जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील



तळेगाव ( शामजी पंत ) येथे होणार असून या साहित्य संमेलनाचे उद्घाटन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष व सुप्रसिध्द साहित्यिक प्रा.शरद गोरे यांच्या हस्ते होणार आहे,

छत्रपती संभाजी महाराज यांनी संस्कृत भाषेत लिहिलेल्या बुधभूषण या ऐतिहासिक ग्रंथाचा मराठी काव्य अनुवाद त्यांनी केला असून शेतकर्यांच्या आत्महत्या की हत्या यासह १० विपूल ग्रंथाचे लेखन गोरे यांनी केले आहे, रणांगण,प्रेमरंग,उषःकाल,ऐतवी,सूर्या, फुल टू हंगामा,आदी मराठी चित्रपट त्यांनी लेखक,दिग्दर्शक,निर्माता,संगीतकार व अभिनेता म्हणून केले आहेत,आजवर विविध विषयांवर त्यांनी हजारो व्याख्याने दिली आहेत, इतिहासाचे गाढे अभ्यासक म्हणून ते महाराष्ट्रास परिचित आहेत तेवढेच आपल्या अमोघ वाणीतील व्याख्यानासाठी हि ख्यातकीर्त आहेत. उद्धघाटन,परिसंवाद कविसंमेलन असे संमेलनाचे स्वरूप असणार आहे, एकदिवसीय होणार्या या साहित्य संमेलनास मोठया संख्येने साहित्यिक उपस्थित राहणार आहे, या संमेलनात विविध साहित्यिकांच्या पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे व विविध क्षेत्रातील मान्यवरांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे, महात्मा फुलेंच्या यांच्या कार्याचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून या साहित्य संमेलनाचे आयोजन दरवर्षी राज्यात विविध ठिकाणी केले जाते, या पूर्वी पुणे,सोलापूर,गोंदिया,रामटेक या ठिकाणी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते, या संमेलनाच्या आयोजनाची जबाबदारी साहित्य परिषदेचे वर्धा जिल्हाध्यक्ष नरेंद्र गुळधाने हे समर्थपणे पार पाडत आहेत,साहित्य परिषदेचे विदर्भ प्रदेशाध्यक्ष प्रा.मिलिंद रंगारी,विदर्भ कार्याध्यक्ष नामदेव राठोड, विदर्भ महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा संगीता बांबोळे, अमरावती विभागीय अध्यक्ष शिवा प्रधान ,आदीजण संमेलनाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेत आहेत,आष्टी तालुक्यात प्रथम होणार्या हे साहित्य संमेलन साहित्य रसिकांसाठी विशेष पर्वणी ठरणार आहे.

## मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमीत्त ९८४ जणांचे रक्तदान

### महिलांचा मोठा सहभाग



वडवणी । प्रतिनिधी

मराठा समाजाचा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवस काल गुरुवार १ ऑगस्ट रोजी वडवणी शहरासह ग्रामीण भागात विविध उपक्रम राबविण्यात आले होते. यात वडवणी शहरात संभाजी महाराज व्यापारी संकल येथे भव्य रक्तदान शिबीर घेण्यात आले यामध्ये तब्बल ९८४ रक्तदाते सहभागी झाले होते.यात ४२ महीला सहभागी झाल्या तर लढा दुष्काळाशी फाऊंडेशन बीडच्या वतीने रक्तदात्यांना वृक्ष वाटप करण्यात आले. गोर गरीब ऊसतोड कष्टकरी वंचित मराठा समाजाला आरक्षण मिळावे सगेसोयऱ्यांसह मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेल्या ११ महीण्या पासून आपल्या जीवाची परवा न करता अनेक वेळा उपोषण करुन सरकारला सळो की पळो करून सोडणारा

सकल मराठा समाजाचा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटिल यांच्या वाढदिवसानिमित्त तालुक्यासह ग्रामीण भागामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले होते.यामध्ये वडवणी शहरांमध्ये भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.मनोज दादांनी गोरगरीब लेकरा बाळांना आरक्षण मिळावे यासाठी आपल्या जीवाची पर्वा न करता कठोर उपोषणा केली.त्यांनाही समाजाने अक्षरशा डोक्यावर घेतले व आपला दैवत मानले दैवताला मोठ्या उत्साहामध्ये रक्तदान करून शुभेच्छा दिल्या रात्री उशिरापर्यंत रक्तदान करणाऱ्यांचा ओघ सुरूच होता. या रक्तदान शिबीर मध्ये सर्व समाज बांधव सहभागी झाले होते.

या शिबीरात जास्तीत जास्त रक्तदान होण्यासाठी समाज बांधवांनी जनजागृती गावोगावी केली यात ग्रामीण भागासह शहरातील युवक जेष्ठ नागरिक महिलांनी सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.रात्री उशिरापर्यंत ९८४ रक्तदात्यांनी रक्तदान केले यामध्ये ४२ महिलांचाही सहभाग होता.शिबीर यशस्वी करण्यासाठी मराठा समाज वडवणी तालुक्याच्या वतीने मेहनत घेतली.सर्व रक्तदात्यांना लढा दुष्काळाची फाउंडेशन बीडचे अध्यक्ष अँड राज पाटील यांच्या वतीने वृक्ष व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

## जय जवान विद्यालयात साठे जयंती व टिळक पुण्यतिथी

वडवणी । प्रतिनिधी

आज दि.१ ऑगस्ट २०२४ रोजी जय जवान माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कवडगाव बू. ता.वडवणी जी बीड येथील विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी कार्यक्रम संपन्न झाला. सदरील कार्यक्रम ची सुरूवात विद्यालयाचे प्राचार्य/ मुख्याध्यापक श्री. सारोक्ते डी. जी व गावातील शिक्षणप्रेमी प्रतिष्ठित नागरिक श्री. रावसाहेब राऊत (जिजा),श्री. महादेव साळवे,

शिक्षणप्रेमी श्री.दगडू कानडे सदस्य व प्रमुख पाहुणे,कार्यक्रम अध्यक्ष यांच्या हस्ते दोन्ही महापुरुषांच्या पावन प्रतिमेचे पूजन करून व पुष्प माला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले व कार्यक्रमाची



सुरुवात झाली. सर्व विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुणे रावसाहेब राऊत (जीजा) यांनी दोन्ही महापुरुषाचे विचार , कार्य परिचय करून देत आपण काय केले पाहिजे ,कसे आपण आदर्श जीवन जगावे , वाचनाचा व्यासंग छंद कसा जोडावा असे विद्यार्थी दशेत असता अवांतर वाचनाची गोडी निर्माण व्हावी अशा प्रकारे आपले अनमोल विचार प्रकट करून विद्यार्थ्यांना संबोधित केले.त्याच बरोबर वर्ग ८ वी ते वर्ग १२ वी मधील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यामध्ये कु. करे पल्लवी, करे रुपाली,करे अमृता, बंडगर पूजा आदी विद्यार्थिनींनी विशेष व उत्कृष्ठ मनोगत व्यक्त केले.त्यांना कार्यक्रमाचे औचित्य साधुन शिक्षणप्रेमी , प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते मुलांना बक्षीस वितरण करण्यात आले. त्याच बरोबर सर्व विद्यार्थ्यांना अल्प आहार देण्यात आला.सदरील कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व विद्यार्थी विद्यार्थीनी तसेच अध्यक्ष, सदस्य,पालक वर्ग,शिक्षणप्रेमी,प्रतिष्ठित नागरिक,सर्व गावकरी मंडळी माजी विद्यार्थी ,विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद सर्व उपस्थित होते.सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक प्रमुख श्री.चोपडे सर यांनी केले व शेवटी कार्यक्रमाचे आभार टले सर यांनी केले व कार्यक्रमाची सांगता झाली.

## वरवटी येथे अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मौजे वरवटी येथे अण्णाभाऊ साठे यांची १०४ व्या जयंतीचे आयोजन करण्यात होते. या वेळी प्रमुख व्याख्याते म्हणून ॲड. राजेश शिंदे उपस्थित होते त्यांनी या प्रसंगी उच्च शिक्षण घेऊन अण्णाभाऊ साठे यांचा वैचारिक वारसा पुढे नेणे काळाची गरज आहे असे मत समाज बांधवांना संबोधित करताना व्यक्त केले. मौजे वरवटी येथे तरुणांनी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंती चे आयोजन केले होते यावेळी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या वेळी व्याख्याते म्हणून आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते ॲड. राजेश शिंदे उपस्थित होते. याप्रसंगी प्रदीप कोठुळे, गहनाथांन खोटे, बबन कोटुळे, बबन शिंदे, दत्ता लांडगे, गोरख सोनवणे, संतोष कोटुळे, शंकर लांडगे, रायचंद लांडगे, भीमराव लांडगे, किसन लांडगे, दयानंद लांडगे, उत्त्रेश्वर लांडगे, गोकुळ लांडगे, अंजली लांडगे, रवी लांडगे, दादाराव लांडगे, बाळू लांडगे, महादेव लांडगे, खंडू लांडगे, कैलास लांडगे, संजय लांडगे, राजेश लांडगे, अजिंक्य लांडगे, विकास लांडगे, कारण लांडगे, अभिषेक लांडगे, ओम लांडगे, नवनाथ लांडगे, रोहन लांडगे यांच्यासह महिला तरुण समाज बांधव उपस्थित होते.

## वकील संघाच्या वतीने अण्णाभाऊ साठे जयंती

माजलगाव: येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय माजलगावच्या वकील संघात साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. दिनांक १ ऑगस्ट रोजी बीड जिल्ह्यात नामांकित असलेल्या वकील संघात वकील बांधवानी मोठया उत्साहात साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी केली.या जयंती उत्सवाच्या कार्यक्रम प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वकील संघाचे अध्यक्ष ऍड. बी. आर. डक हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा प्रमुख उपस्थिती म्हणून ऍड. एस. सी. शर्मा होते.जयंती कार्यक्रम मध्ये प्रथम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक माजलगाव वकील संघाचे उपाध्यक्ष ऍड. एस. एस. कसबे यांनी केले यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन



कार्याबद्दल व सामाजिक योगदानावर यावेळी प्रकाश टाकला,त्या नंतर वकील संघातील विधिज्ञानी अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी मनोगत व्यक्त केले यामध्ये जेष्ठ विधिज्ञ ऍड. डोंगरदिवे,ऍड. एम.एन.जाधव यांनी मनोगत व्यक्त केले.ऍड.एस.सी. शर्मा यांनी मनोगत व्यक्त करत असताना त्यांनी स्वतः साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांना १९६७ साली माजलगाव येथे ते एका सभेकरिता आले असता प्रत्यक्ष पाहीले असल्याचा अनुभव सांगितला. तर अध्यक्षीय समारोप ऍड. बी. आर. डक यांनी केला व आभार प्रदर्शन ऍड.डी.जी. जाधव यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वकील संघातील विधिज्ञ अ‍ॅड. व्ही.एस. जोशी, अ‍ॅड. वाय.बी. मुंडे, अ‍ॅड.गजमल, अ‍ॅड. डी. डी.ढाकणे, अ‍ॅड.तेरकर, अ‍ॅड.एस.यू. सोळंके, अ‍ॅड.जी.के. मिसाळ, अ‍ॅड.डि एच. कसबे,अ‍ॅड.विजय कुरे, अ‍ॅड.एम.एस. कुंभार, अ‍ॅड.व्ही. व्ही.देशमुख, अ‍ॅड.आर.आर.साबळे, अ‍ॅड.रवींद्र टाकणखार, अ‍ॅड. अर्जुन शिंदे,अ‍ॅड.टी. पी.रेडे,अ‍ॅड. नंदकिशोर खळगे, अ‍ॅड.चेतन सातपुते, अ‍ॅड.गाडेकर, अ‍ॅड. बागल, अ‍ॅड.कांचन भालेराव,अ‍ॅड.वडमारे व इतर सर्व सिनिअर व जुनिअर वकील बांधव मोठ्या उत्साहात उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

## श्रींच्या पालखीचे जालना शहरात उत्साही स्वागत

जालना । प्रतिनिधी

श्री गजानन महाराज पालखीचे जालना शहरात आगमन शहर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री संतोष खांडेकर यांनी विधिवत पूजा करून पालखी सोहळ्याचे स्वागत केले यावेळी विजय फुलंब्रीकर, संजय भालेराव छायाचित्र किरण खानापुर हे होते. आषाढी एकादशी निमीत्ताने श्री क्षेत्र पंढरपूर येथून परतीच्या मार्गावर असलेल्या विदर्भातील पंढरी श्री क्षेत्र शेगाव येथील संतश्रेष्ठ, योगीराज,कैवल्यमुर्ती,भक्तप्रतिपालक, श्री.गजानन महाराज यांच्या पालखी चे गुरूवारी ( ता. ०१) जालना शहरात आगमन झाले. हाती भगवे ध्वज, टाळ- मृदंगाच्या गजरात अभंग, गवळणी, भारूडांवर पाऊली खेळणारे वारकरी, विविध रंगाच्या फुलांनी सजलेल्या पालखीत विराजमान झालेल्या योगी राजांच्या मनमोहक मुखवट्याचे महिला व भाविकांनी दर्शन घेऊन श्रींचे जल्लोष , भक्तीभावाने स्वागत केले. गण,, गण,, गणांत बोते च्या गजराने अवघे शहर दुमदुमून गेले.



शेगाव येथील संतश्रेष्ठ श्री. गजानन महाराज संस्थान च्या पायदळ वारीचे हे ५५ वे वर्ष असून पालखी सोबत ८०० वारकरी, ०२ अश्व, १० वाहने,औषधोपचारांसह सुसज्ज रुग्णवाहिका, पाण्याचे टँकर असा मोठा लवाजमा आहे. आज अंबड येथून दुपारी जालना शहरात पालखी चे आगमन झाले. शहराच्या सीमेवर नगरपरिषद प्रशासनातर्फे स्वागत करण्यात आले. अंबड रोड वरून चौफुली, नुतन वसाहत, उड्डाण पुलाच्या खालून शनिमंदिर मार्गे जात

### वरून राजाने केली वृष्टी....!

पालखीचे उड्डाण पुलाखाली साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौकात आगमन होताच पावसास सुरुवात झाली. पुलाखालून शनिमंदिर पर्यंत मध्यम ते थोड्या तीव्र स्वरूपाचा पाऊस वारकरी आणि पालखीवर बरसला भाविकांनी कोसळणाऱ्या पावसातही पालखी भोवती गर्दी करून मनोभावे श्रींचे दर्शन घेतले. सरस्वती भुवन प्रशाले जवळ आनंदी स्वामी ढोल पथकाने ढोल वादन करून पालखीस मानवंदना दिली.

सरस्वती भुवन शाळा येथे पालखी विसावली. पालखी येणार असल्याने जालनेकरांना पालखी च्या दर्शन व स्वागतासाठी मोठी उत्सुकता होती. पालखी मार्गावर महिलांनी रांगोळ्या, फुले, टाकली. तर ठिक- ठिकाणी पुष्पवृष्टी करण्यात आली. महिला, तरूण, बालके, अबालवृध्दांसह भाविकांनी दर्शनासाठी एकच गर्दी केली होती. वारकऱ्यांना दुध, फळे, फराळ,बिस्किट पुडे,सुकामेवा ची पाकीटे उपयोगी साहित्याची पाकीटे, भाविकांनी वितरित केली.रहदारीस अडचणी होऊ नये यासाठी संस्थान ने गतवर्षी पासून पालखी मार्गात बदल केला. शनिमंदिर येथून कचेरी रोड, मार्गे सरस्वती भुवन शाळा येथे सायंकाळी ०५.०५ वा.पालखी पोहोचली. पालखी मार्गावर पोलीस प्रशासनाने जागोजागी चोख बंदोबस्त ठेवला. अंबड चौफुली वर जड वाहने पालखी मार्गस्थ होईपर्यंत थांबविण्यात आली. पालखी सोबत पोलीसांची वाहने, अधिकारी, कर्मचारी बंदोबस्तात होते. स. भु. शाळेत रात्री उशीरापर्यंत भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली. खेळणी , कटलरी विक्रेते, फेरीवाले यांनी दुकाने थाटली, परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. दरम्यान शुक्रवारी ( ता. ०२) पहाटे सरस्वती भुवन प्रशालेतून पालखी प्रस्थान करेल. गांधी चमन, मस्तगड, सुभाष चौक, महावीर चौक, मामा चौक, सावरकर चौक, टांगा स्टँड, राम मंदिर, मार्गे जात जे. ई. एस. महाविद्यालयात पालखी चा विसावा राहणार असून शनिवारी ( ता. ०३) पहाटे पालखीचे नाव्हामार्गे विदर्भात प्रस्थान होईल.

# साळींबा ठिबक उपसा सिंचन योजना शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार -आ.सोळंके

## मराठवाड्यातील सर्वात मोठी जल उपसा सिंचन योजना; ६ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येणार

**वडवणी । प्रतिनिधी**

साळींबा ठिबक उपसा सिंचन योजना याला शासनाकडून तत्वतः मान्यता देण्यात आलेली असून या योजनेसाठीचा पूर्ण १०० टक्के खर्च महाराष्ट्र शासन करणार आहे. विशेष म्हणजे यासाठी कोणाही शेतकऱ्याची जमीन संपादित करण्याची आवश्यकता नसून माजलगाव जलाशयातून बंद नलिकेव्दारे शेतकऱ्यांना पाणी दिले जाणार आहे. सदरील योजना उर्ध्व कुंडलिका प्रकल्पाप्रमाणेच तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार असून ही मराठवाड्यातील सर्वात मोठी जल उपसा सिंचन योजना असणार आहे. यामुळे तब्बल ६ हजार हेक्टर जमीन ओलिताखाली येणार असून यामुळे आपल्या सोबतीला कायम असलेला दुष्काळी भाग हा डाग पुसण्यास निश्चितपणे मदत होईल अशी माहिती माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांनी वडवणी याठिकाणी आयोजित पत्रकार परिषदेत संबोधित करताना दिली.

माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्यावतीने काल दिनांक २ ऑगस्ट २०२४ शुक्रवार रोजी वडवणी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहामध्ये पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्यासह बीड जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंग भैय्या सोळंके, माजी आमदार केशवराव दादा आंधळे, बाजार समितीचे सभापती संभाजीराव शिंदे, नगराध्यक्ष शेषेराव बाप्पु जगताप, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, उपसभापती अनिलदादा चोले,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष बजरंग आप्पा साबळे, यांसह इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी वडवणी शहरासह तालुक्यातील विविध अडीअडचणी समस्या व विविध योजना यासंबंधी यथासांग चर्चा झाली. दरम्यान वडवणी शहरातील व्यापारी संकुलाचा प्रश्न असो ग्रामीण रुग्णालय, शहरातील रस्ते, नाली, स्वच्छता व बसस्थानक या सर्व बाबींवर आमदार सोळंकेंनी महत्त्वपूर्ण अशी माहिती दिली. व्यापारी संकुलाचा प्रश्नही येत्या पंधरा दिवसांच्या आत मार्गी लागणार असून त्याची लिलावाची प्रक्रिया लवकरात लवकर सुरु करण्यासाठी आपण जिल्हाधिकारी यांना कळवणार आहोत. तसेच ग्रामीण रुग्णालयासाठीच्या जागेचा प्रश्नही मार्गी लागला असून लवकरच आहे त्या जागेमध्ये ग्रामीण रुग्णालयाची सुरुवात होवून जाईल. बस स्थानकासाठीही आपले प्रयत्न व पाठपुरावा




सुरु आहेत. शहरातील अंतर्गत विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी वडवणी नगरपंचायतीकडे वर्ग केलेला आहे. मात्र स्थानिकच्या काहींनी खोडसाळपणे याला न्यायालयामध्ये आव्हान देवून यावर स्थगिती आणलेली आहे. मात्र ही स्थगिती उठवून लवकरात लवकर सर्व विकास कामे करण्यासाठी नगरपंचायत प्रशासन तत्परतेने काम करत आहे. या पत्रकार परिषदेचा मुख्य उद्देश हा वडवणी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये नवी क्रांती घडवून आणणारा आणखी एक प्रकल्प शासनाकडून मंजूर झाला असून साळींबा ठिबक उपसा सिंचन योजना ही उर्ध्व कुंडलिका प्रकल्पाच्या धर्तीवर वडवणी तालुक्यासाठी नंदनवन ठरणार आहे. माजलगाव धरणाच्या जलाशयामधून ठिबक सिंचनासाठी अनुज्ञेय होणाऱ्या पाण्यापैकी जायकवाडी प्रकल्प टप्पा २ या प्रकल्पाचा भाग म्हणून साळींबा ठिबक उपसा सिंचन योजनेस १९.८१ द.ल.घ.मी. एवढा पाणीवापर अनुज्ञेय होण्यास विशेष बाब म्हणून शासकीय खर्चातून उपसा सिंचन योजना हाती घेण्यासाठी तत्त्वतः मान्यता शासनाकडून देण्यात आली आहे. या योजनेच्या माध्यमातून तालुक्यातील देवडी येथील १०५७.१५ हेक्टर, पिंपरखेड येथील ११०४.४९ हेक्टर, चिंचवडगाव येथील ७९०.३५ हेक्टर, हरिश्चंद्र पिंपरी येथील ९६८.२१ हेक्टर, साळींबा येथील ५६२.८७ हेक्टर तर चिंचाळा येथील १३८०.२७ हेक्टर अशाप्रकारे एकूण ६ गावातील ५ हजार ८६४ हेक्टर एवढी शेतजमीन सिंचनाखाली येणार असून हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यास वडवणी तालुक्यातील एकूण शेतजमिनी पैकी जवळपास ८० ते ९० टक्के शेतजमीन ही सिंचनाखाली येणार आहे. विशेष म्हणजे या योजनेसाठी शेतकऱ्यांची कसल्याही प्रकारची जमीन संपादित करण्याची आवश्यकता नसून माजलगाव जलाशयातून बंद नलिकेव्दारे हे पाणी शेत जमिनींना दिले जाणार आहे. प्रत्येकी २ हेक्टर अंतरावरील ठिकाणी १ पाण्याचा आऊटलेट पॉईंट काढला जाणारा असून तेथून हा पाणीपुरवठा आजूबाजूच्या शेत जमिनीला केला जाणार आहे. या योजनेच्या मान्यतेसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. ही मराठवाड्यातील सर्वात मोठी जल उपसा सिंचन योजना ठरणार असून विशेष म्हणजे यासाठी लागणारी संपूर्ण वीज ही सौरऊर्जेपासून निर्माण होणार असून यासाठी २५ कोटी रुपये खर्चाचा सौर ऊर्जा प्रकल्प देखील उभारला जाणार आहे. परिणामी विजेचा संपूर्ण खर्चही वाचणार आहे. या योजनेमुळे सिंचनाची शाश्वत सोय असल्याने येथील शेतकऱ्यांचे दरडोई उत्पन्न वाढीस निश्चितपणे हातभार लागणार असून वडवणी तालुक्यातील या तिन्ही प्रकल्पामुळे तालुक्यातील जवळपास ९० टक्के जमीन ही सिंचनाखाली येणार आहे. भविष्यात वडवणी तालुका हा बागायतदारांचा तालुका म्हणून ओळख निर्माण होणार असून सदरील योजना आगामी एक ते दीड वर्षात पूर्णत्वास नेण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेसाठी जवळपास ३५० ते ४५० कोटी रुपये अंदाजे खर्च होणार असून या प्रकल्पामुळे वडवणी तालुक्याच्या वैभवात निश्चितपणे भर पडणार आहे. मात्र शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाव्दारे शेतीला पाणीपुरवठा केल्यास पाण्याची बचत होईल व सर्वांना चांगल्या प्रकारे शेती करता येईल हेही लक्षात घेतले पाहिजे. या योजनेच्या भुमिपूजन समारंभास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी येणार असल्याचा शब्द दिला असून विधानसभेची आचारसंहिता लागण्या अगोदरच या कामाचा शुभारंभ होणार असल्याचेही यावेळी आमदार प्रकाश सोळंके यांनी नमूद केले. वडवणी तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने विविध प्रश्नांची उकल या पत्रकार परिषदेतून झाली.

# अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी प्रयत्नशील

## डॉ.योगेश क्षीरसागर : बीडमध्ये समता ज्योत रॅलीत गर्दी

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा शहरात पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.



शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या अर्धाकृती पुतळ्यास जयंतीनिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन कार्यक्रम गुरुवारी (दि.१) पार पडला. यावेळी डॉ.योगेश क्षीरसागर हे बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न देण्यासंबंधी मागणीला आमचा कायम पाठिंबा आहे. शहरात अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास अनेकांनी विरोध केला. हा विरोध झुगारून तत्कालीन नगराध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी पुतळा उभारला आहे. आपण त्यांचाच वारसा चालवत असून समाजबांधवांच्या भावनांचा आदर ठेवून काम करू असे ते म्हणाले. दरम्यान, अभिवादन कार्यक्रमासह साहित्य दिंडीत त्यांनी सहभागी घेतला. त्यानंतर पेठ बीड भागातील युवा नेते विनोद उर्फ दादा हातागळे यांच्यावतीने जयंतीनिमित्त समता ज्योत रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीत सहभागी होत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिवसैनिकांनो, मला आमदार नाही तर बीडच्या जनतेला आमदार बनवण्यासाठी कामाला लागा- अनिलदादा जगताप

**बीड । प्रतिनिधी**

गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि सामान्य जनतेसाठी अहोरात्र काम करणारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या कार्यपद्धतीला प्रभावित होऊन शिवसेना पक्षात प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. एकनाथ शिंदे साहेब आणि डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शन नेतृत्वाखाली शिवसेनेचे मार्गक्रमन यशस्वीपणे सुरु आहे. त्यामुळे आपल्याला जनतेच्या भल्यासाठी पक्ष संघटना मजबूत करून येणाऱ्या विधानसभेला आपले नेते शिंदे साहेब यांचे हात बळकट करावे लागणार आहेत तरच महाराष्ट्रावर पुन्हा एकदा भगवा फडकला जाईल असे मत शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, शिवसैनिकांनो, यंदा



विधानसभेला मला आमदार बनवण्यासाठी नाही तर बीड मतदार संघातील प्रत्येक माणसाला आमदार बनवण्यासाठी आणि सामान्यांच्या घरात सत्ता पोहचवण्यासाठी दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करा. पूर्ण ताकदीने कामाला लागा, यंदाच्या निवडणुकीत अनिल जगताप नाही तर बीडचा सामान्य घरातला प्रत्येक माणूस आमदार झाला पाहिजे. असं वक्तव्य शिवसेना जिल्हाप्रमुख मा. अनिलदादा जगताप यांनी शिवसेना पदनियुक्ती तथा प्रवेश सोहळ्या दरम्यान केले.

काल दि. १ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यलय जालना रोड बीड येथे पदनियुक्ती तथा प्रवेश सोहळा पार पडला. यामध्ये नव्याने लखन जगताप यांचा शिवसेनेत प्रवेश घेण्यात आला. याबरोबरच विकास लांडगे- विभाग प्रमुख, रणजीत बुंदीले - विभाग प्रमुख, ऋषीकेश जोगदंड- शहर सहसंघटक, अक्षय काशिद- उपशहर प्रमुख यांचा प्रवेश घेऊन नियुक्तीपत्र देत पदनियुक्ती करण्यात आली तर शिवसेना तालुका कार्यकारणीवर रजनीकांत उर्फ गणेश श्रीमंत मस्के- तालुका संघटक, ज्ञानेश्वर नागोराव ढास- तालुका सह सचिव, ढास दादासाहेब त्रिबंक - उपतालुका प्रमुख पदावर नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. याबरोबरच लिंबागणेश जि. प. सर्कलमधील ढवळे सुरेश दगडु - विभाग प्रमुख, सुर्वे सदाशिव उपविभागप्रमुख, जाधव अशोक श्रीपती - सर्कलप्रमुख, घोलप सुनिल रावसाहेब - सर्कलप्रमुख, वायभट कृष्णा मनोहर -उपसर्कलप्रमुख, वळे दत्ता ज्ञानोबा - उपसर्कल प्रमुख पदावर नियुक्तीपत्र देत नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नंदकिशोर पिंगळे यांनी केले तर सुनील सुरवसे जिल्हा संघटक बीड, संतोष जाधव उप जिल्हाप्रमुख, मकरंद उबाळे तालुका प्रमुख आणि गणेश मस्के तालुका संघटक बीड यांनी आपले मनोगत व्यक्त करत येत्या विधानसभेला पक्ष संघटना मजबुतीसाठी आणि मुख्यमंत्री शिंदे साहेबांचे हात बळकट करण्यासाठी पूर्ण ताकदीने काम करू अशी ग्वाही दिली. अनिलदादा जगताप यांनी आपल्या अध्यक्षीय भाषानात शिवसैनिकांना संबोधित केले. बीड मतदार संघात काम करण्याचे दिशा धोरण ठरवून दिले. पक्ष संघटन वाढवण्यासाठी महत्वपूर्ण मार्गदर्शन केले आणि विधानसभाच नाहीतर येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीला शिवसेनाचा भगवा फडकवण्यासाठी शिवसैनिकांना पूर्ण ताकदीने काम करण्याचे आवाहन केले. याप्रसंगी शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी तथा शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### श्रीमती कुलकर्णी यांची नायब तहसीलदारपदी पदोन्नती

अंबड । प्रतिनिधी

अंबड तहसील कार्यातील संजय गांधी विभागांमध्ये कार्यरत असलेले अंजली कुलकर्णी अव्वल कारकून संवर्गातून नायब तहसीलदार पदोन्नती पदस्थापना नायब तहसीलदार (संगायो ) तहसील कार्यालय भोकरदन येथे झाली आहे तसेच चार्ज घेण्यात आला.

यावेळी श्री दत्तोपंत देशपांडे, कांतराव वडगावकर,शरद कुलकर्णी अमित कुलकर्णी लक्ष्मीकांत, संतोष, श्रीपाद, सतीश,सचिन अभय,गणेश, विजय,यशवंत देशपांडे , विजय कोठोडे पदनियुक्ती झाल्याने अंजली कुलकर्णी यांचे अभिनंदन केले.

# परळीकरांचे जलसंकट दूर;वाण धरण पूर्ण भरले; जुलै अखेर ६६ टक्के पाऊस

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहराला पाणी पुरवठा करणारे तालुक्यातील नागापूर येथील वाण मध्यम धरण १०० टक्के भरले. पाणी धरणाच्या सांडव्यावरून वाहण्यास सुरूवात झाली आहे. नागापूर धरण पूर्ण भरल्याने परळीकरांवरील जलसंकट दूर झाल्याने परळीकरांनी समाधान व्यक्त करत आहेत. तसेच वाण धरणाच्या लाभक्षेत्रातील गावांना देखील धरण पूर्ण भरल्याने शेतीसाठी पाण्याची सोय झाली आहे.




१९६६ मध्ये बांधकाम पूर्ण झालेल्या परळी तालुक्यातील नागापूर वाण धरणाची एकूण पाणीसाठा क्षमता १९.७२ द.ल.घ.मी एवढा आहे. धरणातील लाभक्षेत्रातील गावांमध्ये परळी तालुक्यातील नागापूर, माळहिवरा, मांडेखेल, तळेगाव, तडोळी, भिलेगाव, परचुंडी, लिंबूटा यासह इतर लहानमोठ्या १६ गावांचा समावेश आहे. परळी शहर व तालुक्यात एकूण सरासरी पर्जन्यमानाच्या ६६ टक्के पाऊस झाल्याने परळी शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या नागापूरच्या वाण धरणात पावसाच्या पाण्याची आवक गेल्या काही दिवसांपासून सुरू झाली दरम्यान शुक्रवार दि २ रोजी सकाळी हे धरण पूर्ण भरले. उन्हाळ्यात धरणाची पाणी पातळी घटल्याने परळीनगर परिषदेने शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा चालू होता. शहरात सुधारित पाणीपुरवठा करण्याचे नियोजन लवकरच नगरपालिकेला करावे लागणार आहे. दरम्यान नागपूर धरण भरल्याने परळी शहरात दोन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याची मागणी परळीकर करत आहेत.

# वृक्षारोपण व रक्तदान करून मनोज दादा जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांचा आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघामध्ये वाढदिवस मोठ्या उत्साहामध्ये साजरा करण्यात आला. वृक्षारोपण व रक्तदान शिबिर अंभोरा येथील सरपंच सागर आमले यांच्या संकल्पनेतून अभिनय उपक्रम राबवून मनोज दादा जरांगे पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

एक ऑगस्ट रोजी मराठा आरक्षणासाठी आपल्या सर्वस्व पणाला लावणारे मनोज दादा जरांगे पाटील यांचा वाढदिवस पूर्ण महाराष्ट्रभर साजरा करण्यात आला. यामध्ये आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघात सरपंच सागर आमले यांच्या अभिनव संकल्पनेतून या मतदारसंघातील शाळेमध्ये विद्यार्थ्यांना रोपे वाटण्यात आली. शाळेतील प्रत्येक





वर्गाला एक रोप देण्यात आले. व ते रोप जो वर्ग पुढच्या वर्षापर्यंत त्या रोपाची जोपासना करेल त्याची काळजी घेईल त्या वर्गास योग्य ते बक्षीस दिले जाईल. अशी आगळीवेगळी संकल्पना या दिवशी राबवण्यात आली.

मनोज दादा जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त अंभोरा येथे रक्तदान शिबिर घेण्यात आले. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असे मानले जाते.यामध्ये जवळपास २० तरुणांनी रक्तदान केले. हे रक्तदान तरुणांनी स्वयंस्फूर्तीने केले. मतदारसंघातील शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर केशर आंब्याचे रोप विद्यार्थ्यांना वर्गानुसार वाटप करण्यात आले. ज्याही वर्गातील रोप पुढच्या वर्षी एक ऑगस्ट रोजी चांगल्या स्थितीत असेल त्या वर्गाला योग्य ते बक्षीस देण्याची हमी विद्यार्थ्यांना देण्यात आली. मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज दादा जरांगे पाटील यांनी अनेक उपोषण केले अनेक समाज जागृतीच्या रॅली काढल्या. त्यांना दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा व्यक्त करण्यात आली व अनेक ठिकाणी वेगवेगळे उपक्रम राबवण्यात आले.

# जय भवानी परिवारानं मला भरभरून दिलं, मोठं केलं -प्राचार्य डॉ. कांचन परळीकर

**गेवराई । प्रतिनिधी**

प्राचार्य म्हणून काम करतांना बरे-वाईट खूप प्रसंग आले, तरी सहकाऱ्यांसह आम्ही त्यावर धीराने मात करीत आलो असून 'जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे' संस्थापक आदरणीय शिक्षणमहर्षी श्री. शिवाजीराव ( दादा) पंडित यांच्या आशीर्वादाने ' जय भवानी ' परिवारानं मला भरभरून दिलं आहे. मोठं केलं आहे, असे भावूक उद्गार प्राचार्य डॉ. कांचन परळीकर यांनी काढले.



प्राचार्य डॉ. कांचन परळीकर यांच्या सेवापूर्ती निमित्त गेवराईच्या महिला महाविद्यालयाने आयोजित केलेल्या 'सेवापूर्ती गौरव सोहळ्याप्रसंगी' सत्काराला उत्तर देताना त्या बोलत होत्या. सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासन अधिकारी श्री. प्रमोद गोरकर होते. याप्रसंगी मंडळाचे लेखापाल प्रा. काशीनाथ गोगुले, पाटोद्याच्या कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास कदम, शिवाजीनगर गढीच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्राचार्य डॉ. कांचन परळीकर पुढे बोलतांना म्हणाल्या की, मंडळाचे अध्यक्ष आदरणीय अमरसिंह पंडित साहेबांनी माझ्यावर विश्वास ठेवून मला प्राचार्य केले. त्या विश्वासाला तडा जाऊ न देता व संस्थापक शिक्षण महर्षी आदरणीय शिवाजीराव (दादा) पंडित यांच्या सामाजिक ◀◀ पान २ वर



# आण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्ती विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**कडा । प्रतिनिधी**

आण्णाभाऊ साठे जयंती निमीत्त साबलखेड येथील जि.प.प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांना साबलखेड लहूजी ग्रुप तर्फे इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करुन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केलेले कार्य धानोरा केंद्राचे केंद्रप्रमुख जावेद पठाण यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. या प्रसंगी सरपंच शिवाजी बुरंगुले,उपसरपंच शरद देसाई,ग्रां.पं.सदस्य लखन साबळे,शालीय समितीचे अध्यक्ष मल्हारी गाडे,तसेच मुख्याध्यापक श्रीमती आढाव मॅडम,धांडे मॅडम,सय्यद मॅडम,औटे सर,चिंमटे मॅडम,तसेच जय लहूजी ग्रुपचे नितीन साबळे,सतिष साबळे,दिपक साबळे, आशोक साबळे, कृष्णा साबळे, शिवम आडगळे, सुरज साबळे, महेश साबळे,जयंती निमित्त उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र अरण येथील ४ ऑगस्ट रोजीच्या कार्यक्रमाचे परळी येथील समाज बांधवांना निमंत्रण

**परळी । प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र अरण येथे येत्या ४ ऑगस्ट २०२४ रोजी भव्य भक्तनिवास व सावता सृष्टी निर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन होणार आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडवणीस साहेब,राज्याचे अन्न व नागरी पूरवठामंत्री मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब,राज्याचे इतरमागास व बहुजन कल्याणमंत्री मा.ना.अतुलजी साहेब यांच्या प्रमुख उपस्थिती राहणार असून आजी-माजी आमदार व संत-महंत यांच्या उपस्थितीमधे होणाऱ्या कार्यक्रमा कार्यक्रमाबाबत माहिती व निमंत्रण देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांनी




## सामाजिक कार्यकर्ते आजीनाथ गवळी यांचे आवाहन

आज दि. ३१/०७/२०२४ रोजी परळी येथे रात्री ७::०० वाजता भेट देऊन समाज बांधवांना संयोजन समितीच्या वतीने निमंत्रण देऊन मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले.यावेळी राजकुमार डाके, केशवराव बनसोडे, प्रकाश लोखंडे, सुदामराव लोखंडे, धोंडीराम वडुळकर, आण्णासाहेब काळे, शिवाजी नीळेकर, बंडु लोखंडे, प्रकाशराव आरसुडे यांचेसह समाजबांधव यांची मोठया संख्येने उपस्थिती होती.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# लाडकी बहिण योजनेच्या साडे तीन हजार अर्जांमध्ये त्रुटी; सुधारणेसाठी दिली संधी

पुणे – लाडकी बहिण योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांची महापालिकेच्या केंद्रांवर गर्दी होत असून, आत्तापर्यंत १ लाख १२ हजार महिलांचे अर्ज भरून झाले आहेत. या अर्जांची पडताळणी करताना सुमारे साडे तीन हजार अर्जांमध्ये त्रुटी आढळल्या आहेत. महिलांना अर्जातील त्रुटी दूर करण्याची एक संधी दिली असून, त्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे आहे.

ही दुरुस्ती त्वरित करून घ्यावी असे आवाहन पुणे महापालिकेने केले आहे. ज्या मोबाईलवरून किंवा संगणकावरून अर्ज केला आहे, त्यावरूनच अर्जात दुरुस्ती करता येईल किंवा कागदपत्रे जोडता येतील, असे समाज विकास विभागाचे उपायुक्त नितीन उदास यांनी सांगितले. राज्य सरकारतर्फे महिलांसाठी 'मुख्यमंत्री–माझी लाडकी बहीण योजना' जाहीर केली आहे. यामध्ये महिलेला प्रत्येक महिन्याला १५०० रुपये बँक खात्यात जमा केले जाणार आहेत. या योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. पुणे महापालिकेने योजनेसाठी नोंदणी करण्यासाठी शहरात १९६ केंद्र सुरु केले आहेत. आजपर्यंत महापालिकेतर्फे शहरात १ लाख १२ हजार अर्जांची नोंद झालेली आहे.




महापालिकेकडे आलेल्या अर्जांची पडताळणी सुरु झाली आहे. आत्तापर्यंत २१ हजार अर्जांची पडताळणी झाली आहे. त्यामध्ये सुमारे साडे तीन हजार अर्ज तात्पुरते नाकारले आहेत. त्यासंदर्भात प्रत्येक महिलेच्या मोबाईल क्रमांकावर मेसेजद्वारे ही माहिती देण्यात आली आहे.

### १६ अर्ज ठरले बाद

**महापालिकेने १ लाख १२ अर्ज दाखल झाले आहेत. त्यापैकी २१ हजार अर्जांची पडताळणी केली आहे. त्यात केवळ १६ अर्ज पूर्णपणे बाद करण्यात आली आहेत. या महिलांचे अर्ज योजनेच्या निकषांमध्ये नसल्याने त्यांचे अर्ज बाद केले आहेत**

आधार कार्ड अस्पष्ट असणे, रेशन कार्डच्या मागील बाजू अपलोड न करणे, बँकेचे खाते, रहिवासी पुरावा न जोडणे किंवा अर्धवट जोडणे, हमीपत्र न जोडणे, परराज्यातील रहिवासी किंवा लग्न करून पुण्यात पंधरा वर्षापासून राहात असल्याचा पुरावा न जोडणे, रेशन कार्ड न जोडणे, उत्पन्नाचा दाखला न जोडणे या कारणांसाठी हे अर्ज तात्पुरते नाकारण्यात आले आहेत. महिलांनी या त्रुटी दूर करण्यासाठी त्यांची कागदपत्र पुन्हा अपलोड करणे आवश्यक आहे. ही शेवटची संधी असणार आहे.

# रेल्वेच्या पुणे विभागाचे प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागणार

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

रेल्वेच्या पुणे आणि विभागातील विविध प्रलंबित विषय मार्गी लावण्यासंदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. मागील अनेक वर्षे प्रलंबित असणारे प्रश्न मार्गी लावतानाच पुण्यातून वंदे भारत ट्रेन सुरु कराव्यात, यावर सकारात्मक चर्चा झाली. विशेष म्हणजे वैष्णव यांनी प्रलंबित विषय मार्गी लावण्यासंदर्भात प्रत्यक्ष नकाशावर सविस्तर माहिती दिली.

पुणे आणि पश्चिम महाराष्ट्रातील रेल्वेचे अनेक विषय गेली काही वर्षे प्रलंबित आहेत. त्यावर लवकरात लवकर तोडगा काढला जावा, यासाठी केंद्रीय मंत्री मोहोळ यांनी पुढाकार घेतला आहे. प्रलंबित विषय मार्गी लावण्यासाठी रेल्वेमंत्र्यांनी सकारात्मकता दाखवल्याने हे विषय लवकरच मार्गी लागणार आहेत. याबाबत माहिती देताना केंद्रीय मंत्री मोहोळ म्हणाले, 'पुणे–दिल्ली वंदे भारत स्लिपर ट्रेन, पुणे–लोणावळा रेल्वे मार्गाचे विस्तारीकरण, पुणे–अहिल्यानगर रेल्वे कनेक्टिव्हिटी, पुणे रेल्वे स्थानकाचे नूतनीकरण, उरुळी कांचन येथे नवे टर्मिनल आदी विषयांवर सविस्तर चर्चा झाली. या सर्व विषयांवर वैष्णव यांनी सविस्तर माहिती तर दिलीच, शिवाय आगामी काळातील कृती आराखड्याबाबतही चर्चा केली'.

### मंत्री वैष्णव यांनी प्रलंबित विषय मार्गी लावण्या संदर्भात प्रत्यक्ष नकाशावर सविस्तर माहिती

### पुण्याहून नाशिक, मुंबई, सोलापूर, नागपूर वंदे भारत मेट्रोचा विचार

**विशेष म्हणजे गुरुवारी लोकसभेतील भाषणात रेल्वेमंत्र्यांनी देशातील महत्वाच्या महानगरांना जोडणारी वंदे भारत मेट्रो सेवा लवकरच सुरू होणार असल्याची घोषणा केली. या अनुषंगाने पुण्याहून नाशिक, मुंबई, सोलापूर, नागपूर या महानगरांसाठी वंदे भारत मेट्रोचा विचार व्हावा, या संदर्भातही चर्चा केली', अशीही माहिती मोहोळ यांनी दिली.**

# सांगली लोकसभेची मावळात पुनरावृत्ती होणार, भाजपच्या बाळा भेगडेंचे विधानसभेत बंडखोरीचे संकेत

पिंपरी चिंचवड पिंपरी–चिंचवड: मावळ विधानसभेत भाजप (इगझ) नेते बाळा भेगडेंनी ) बंडखोरी करण्याचे संकेत दिलेत. सांगली लोकसभेने महाराष्ट्राच्या जनतेचे डोळे उघडले आहेत. स्थानिक कार्यकर्त्यांच्या विरोधात जाऊन पक्षाने निर्णय घेतला, तर काय होतं हे सांगलीकरांनी दाखवून दिलं. हा दाखला देत मावळ विधानसभेत ही बंडखोरी होऊ शकते, याचे स्पष्ट संकेत भेगडेंनी जाहीरपणे दिले. आज मावळ विधानसभेत भाजपने मेळावा घेत शक्तिप्रदर्शन केलं. याद्वारे भाजपने अजित पवार गटाच्या जागेवर हक्क दाखवला. त्यासोबतचं महायुतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार सुनील शेळकेंना उमेदवारी दिली तर भाजप घडाळ्याचा प्रचार करणार नाही, असा ठराव ही मंजूर केला.



बाळा भेगडे म्हणाले, सांगलीच्या जनतेने, कार्यकर्त्यांनी त्यांच्या मनातील उमेदवार मिळाला नाही म्हणून त्यांनी विशाल पाटलांना निवडून दिले. आज मावळ विधानसभेत देखील कार्यकर्त्यांची भावना आणि जनतेची भावना ही मनातील उमेदवार मिळावा या स्वरुपाची भूमिका आहे. मावळ तालुका हा भाजपचा परंपरागत बालेकिल्ला आहे. १९९७ साली रामभाऊ माळगी यांनी मावळ विधानसभेच्या माध्यमातून जनसंघाचे प्रतिनिधित्व केले.मावळ विधानसभेतून सुरू झालेला प्रवास आज राज्याभर पसरलेला पाहायला मिळत आहे.१९५७ ते२०१९ पर्यंत सर्वात जास्त आमदार हे जनसंघ आणि भाजपाचे निवडून आले आहे. कार्यकर्त्यांचे संघटन कार्यकर्त्यांच्या जोरावर लोकप्रतिनिधी निवडून देणारा अशी मावळ मतदारसंघाची ओळख आहे. परंपरागत विचाराचा असल्याने २०१९ च्या निवडणुकीत सुनील शेळके भाजपसोबत शेवटपर्यंत राहिले. परंतु ऐनवेळी त्यांनी आपली भूमिका बदलली म्हणून राष्ट्रवादीचा आमदार निवडून आला. परंतु हा मतदारसंघ परंपरागत भाजपचा आहे.

### मावळ मतदारसंघ भाजपलाच मिळावा, बाळा भेगडेंची मागणी

**बाळा भेगडे म्हणाले, ज्या पक्षाचा आमदार त्यालाच जागा सुटणार असा फॉर्म्युला महायुतीत ठरलेला आहे.त्यामुळे ही जागा सुनील शेळके यांना जाण्याची शक्यता आहे. यावर बोलताना बाळा भेडगे म्हणाले, मी पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता आहे. माझा पक्ष आणि माझा कार्यकर्ता माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ आहे. हा मतदारसंघ चुकून राष्ट्रवादीच्या वाट्याला गेला तर मावळातील कार्यकर्ता आणि विचार जो १९५७ पासून प्रेरणा देतो त्याला कुठेतरी मुठमाती मिळेल. म्हणून आमची पक्षाकडे आग्रहाची भूमिका आहे की, हा मतदारसंघ भाजपलाच मिळाला पाहिजे.**

# अतिक्रमणांवर कारवाई न करणाऱ्या ९ अधिकाऱ्यांना नोटिसा

**पिंपरी–चिंचवड । प्रतिनिधी**

शहरातील विविध भागात गेल्या काही दिवसांपासून अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, हॉटेल्स, पब आणि बारचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर नियंत्रण मिळविण्यात अपयशी झालेल्या आणि कारवाई न करणाऱ्या अतिक्रमण निर्मूलन विभागाचे उपायुक्त, सहा क्षेत्रिय अधिकारी यांच्यासह नऊ अधिकाऱ्यांना नोटीसा दिल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे–पाटील यांनी दिली.

पिंपरी–चिंचवड शहरातून पवना, इंद्रायणी आणि मुळा या तिन्ही नद्या वाहत आहेत. या नदीकाठी मोठ्या प्रमाणात भराव आणि अतिक्रमणे झाली आहेत. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या पावसात नदीकाठच्या रहिवासी भागात पाणी शिरल्याच्या घटना घडल्या. तसेच शहरातील विविध भागातही अनधिकृत बांधकामे, पत्राशेड, पादचारी मार्गावरील अतिक्रमणांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यावर कारवाईसाठी महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन विभागाकडून कानाडोळा केला जात होता. त्यामुळे अतिक्रमण निर्मूलन विभागाचे उपायुक्त, सहा क्षेत्रिय अधिकारी, दोन बीट निरीक्षक अशा नऊ जणांना नोटीसा बजावल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त जांभळे–पाटील यांनी दिली. तसेच नदीकाठच्या अतिक्रमण धारकांना वॉर्निंग देणे, अतिक्रमणे काढून घेण्याबाबत सूचना दिल्या आहेत. अशा अतिक्रमणांवर आता कारवाई करायची की पावसाळ्यानंतर कारवाई करायची याबाबत आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येणार आहे. दरम्यान, शहरातील कोणत्या भागात अतिक्रमणे झाले, किती अतिक्रमण धारकांना नोटीसा दिल्या, कितींवर कारवाई केली याची सर्व माहिती व्हावी यासाठी महापालिकेच्या वतीने एक स्वतंत्र प विकसित करण्यात येत आहे.



# अजित पवारांना इंदापुरात धक्का! प्रवीण माने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात करणार प्रवेश

बारामती । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांमध्ये राजकीय वर्तुळात मोठ्या घडामोडी घडताना दिसत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटीनंतर अजित पवारांसोबत गेलेले अनेक जण पुन्हा शरद पवारांच्या पक्षामध्ये परतताना दिसत आहेत. अशातच इंदापूर जिल्हा परिषदेचे माजी सभापती व सोनाई उद्योगाचे संचालक प्रवीण माने हे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षातून शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार आहेत. शनिवारी हा पक्षप्रवेश होणार आहे

लोकसभा निवडणुकीमध्ये प्रवीण माने यांनी सुप्रिया सुळेंना खासदारकी जाहीर झाल्यानंतर पक्षात काम करण्यास सुरूवात केली. त्यानंतर काही दिवसांमध्येच त्यांनी आपली भूमिका बदलली. दरम्यानच्या काळात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रवीण माने यांच्या घरी भेट देत चर्चा केली. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार यांच्या पक्षासोबत असल्याचे जाहीर केले होते. आता प्रवीण माने हे पुन्हा एकदा शरदचंद्र पवार पक्षांमध्ये प्रवेश करत आहेत.

प्रवीण माने यांचा पक्षप्रवेश शनिवारी दुपारी चार वाजता पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयात होणार आहे. प्रवीण माने पुन्हा एकदा करणार शरद पवारांच्या पक्षात प्रवेश



लोकसभा निवडणुकीआधी प्रवीण माने यांनी शरद पवार गटातून अजित पवारांच्या गटात प्रवेश केला होता. उद्या पुण्यात प्रवीण माने पुण्यात शरद पवारांच्या पक्षात प्रवेश करणार आहेत. लोकसभा निवडणुकीआधी देवेंद्र फडणवीस थेट इंदापूरमध्ये आल्यानंतर प्रवीण माने यांच्या घरी भेट दिली होती. त्यानंतर प्रवीण माने यांनी अजित पवारांच्या पक्षात प्रवेश केला होता.

# ताम्हिणी घाट वाहतुकीसाठी ५ ऑगस्टपर्यंत बंद

पौड : ताम्हिणी घाटाजवळील आदरवाडी व डोंगरवाडी गाव येथील घाट परिसरात राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ एफ वरील रस्त्याच्या एका बाजूस अतिवृष्टीमुळे तडा गेला आहे. त्यामुळे या ठिकाणी रस्ता खचला आहे; नागरिकांची सुरक्षितता तसेच दुर्घटना टाळण्याकरीता आजपासून (शुक्रवार) ५ ऑगस्टपर्यंत हा रस्ता बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिले आहेत. यामुळे ताम्हिणी घाटमार्गे कोकणात जाणारी वाहतूक बंद राहणार आहे.



हे ठिकाण ताम्हिणी घाट वन परिसर क्षेत्रात येते. रस्ता खचलेल्या ठिकाणी दुरुस्तीचे कामे सुरू असून, वाहतूक सुरक्षितेच्यादृष्टीने उपाययोजनाही करण्यात येत आहेत. तथापी पुढील काही दिवसात अतिवृष्टीमुळे हा रस्ता खचून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या महामार्गावरुन नियमित वाहतूक ठेवणे धोकादायक आहे, तसेच शनिवार व रविवारी ताम्हिणी घाट परिसर क्षेत्रात पर्यटकांची गर्दी होते. हे लक्षात घेवून राष्ट्रीय महामार्ग क्र. ७५३ रस्ता बंद करण्यात येत असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# पूजा खेडकरची आई मनोरमा खेडकर यांना जामीन मंजूर!

युपीएससी परीक्षा प्रक्रियेदरम्यान घोटाळ्यामुळं चर्चेत आलेली आणि युपीएससीकडून उमेदवारी रद्द झालेल्या पूजा खेडकर हिची आई मनोरमा खेडकर यांना जामीन मंजूर झाला आहे. मनोरमा यांनी पौड इथं पिस्तूल दाखवून शेतकऱ्यांना धमकावल्याचा प्रकार घडला होता. याप्रकरणी त्यांना काही दिवसांपूर्वी अटक झाली होती.



मनोरमा खेडकर यांच्याविरोधात पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. पोलिसांनी त्यांना अटकही केली होती, तसंच त्यांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली होती. दरम्यान, दोन दिवसांपासून त्यांच्या जामीन याचिकेवर सुनावणी सुरु होती. ही सुनावणी आज पूर्ण झाली आणि कोर्टानं त्यांना जामीन मंजूर केला.

दरम्यान, पौड येथील शेतकऱ्यांना पिस्तुल दाखवून धमकावल्याप्रकरणी त्यांच्याविरोधात पौड पोलिसांत गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर पुणे ग्रामीण पोलीस त्यांच्या मागावर होते. त्यानंतर नाट्यमयरित्या त्यांना अटक करण्यात आली होती. रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या हिरकणीवाडी गावातील एका हॉटेलमध्ये त्या नाव बदलून थांबल्या होत्या. इंदुबाई ढाकणे असं नाव त्यांनी या हॉटेलमध्ये दिलं होतं. आपली ओळख पटवण्यासाठी त्यांनी या नावाचं बनावट आधारकार्डही हॉटेलच्या स्टाफकडं सादर केलं होतं. या हॉटेलमध्ये मनोरमा खेडकर असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती, त्यानुसार पोलिसांनी पहाटे अडीच वाजता इथं छापा मारुन त्यांना १७ जुलै रोजी अटक केली होती,

# नाशिक फाटा ते खेड रस्ता होणार आठ पदरी; केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी

पिंपरी चिंचवड मधील नाशिक फाटा ते खेड या दरम्यानचा रस्ता आठ पदरी होणार आहे. या कामासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. शुक्रवारी (दि. २) केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत देशभरातील आठ मुख्य रस्त्यांच्या कामांना मंजुरी देण्यात आली. त्यामध्ये नाशिक फाटा ते खेड या ३० किलोमीटर अंतराच्या रस्त्याचाही समावेश आहे.

देशात ९३६ किलोमीटर अंतराच्या आठ मार्गांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यासाठी ५० हजार ६५५ कोटी रुपये खर्च होणार आहे. सहा पदरी आग्रा–ग्वाल्हेर राष्ट्रीय हाय स्पीड कॉरिडॉर, चार पदरी खरगपूर–मोरग्राम राष्ट्रीय हाय स्पीड कॉरिडॉर, सहा पदरी थारड–दिसा–मेहसाणा–अहमदाबाद राष्ट्रीय हाय स्पीड कॉरिडॉर, चार पदरी आयोध्या रिंग रोड, चार पदरी पाथलगाव आणि गुलमा रायपुर रांची राष्ट्रीय हाय स्पीड कॉरिडॉर, सहा पदरी कानपूर रिंग रोड, चार पदरी नॉर्थर्न गुवाहाटी बायपास, आठ पदरी एलिव्हेटेड नाशिक फाटा ते खेड कॉरिडॉर या मार्गांचा समावेश आहे.



पिंपरी चिंचवड शहरातील नाशिक फाटा येथून खेड पर्यंत एलिव्हेटेड रस्ता असणार आहे. यासाठी ७८२७ कोटी खर्च होणार आहे. या मार्गामुळे चाकणची वाहतूक कोंडी फोडण्यासाठी मोठी मदत होणार आहे. पिंपरी चिंचवड आणि चाकण येथील औद्योगिक वसाहतींना जोडण्यासाठी हा मार्ग फायदेशीर ठरणार आहे

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्या हस्ते 'कार्यसम्राट मोफत महा–आरोग्य शिबीरा'चे रविवारी उद्घाटन

पुणे : दिवंगत कार्यसम्राट आमदार विनायक निम्हण यांच्या जयंतीनिमीत्त सोमेश्वर फाऊंडेशनतर्फे आयोजित कार्यसम्राट मोफत महा–आरोग्य शिबीराच्या तिसऱ्या टप्प्याचे उद्घाटन सर्वपक्षीय नेत्यांच्या हस्ते होणार आहे. सिंचननगर येथील कृषी महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित रविवारी (दि. ४ ऑगस्ट) सकाळी ९ वाजता राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती संयोजक माजी नगरसेवक सनी निम्हण यांनी दिली.

सनी निम्हण म्हणाले, महाआरोग्य शिबिराच्या तिसऱ्या टप्प्याच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कृषी मंत्री धनंजय मुंडे, आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत, उद्योग मंत्री उदय सामंत, शिवसेना उपनेते सचिन अहिर, खासदार सुप्रिया सुळे, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्यासह पुण्यातील सर्व आमदार, माजी नगरसेवक आदी सर्वपक्षीय मान्यवर उपस्थित असणार आहेत.

महाआरोग्य शिबीर २२ जुलैपासून सुरू करण्यात आले. शिवाजीनगरपासून पाषाण, सोमेश्वरवाडीपर्यंत ३६ ठिकाणी आरोग्य केंद्र उभारण्यात आले आहेत. यामध्ये पूर्व तपासणी, प्रथमिक उपचार, इसीजी, रक्त–लघवी तपासणी, सोनोग्राफी, एक्स रे, टूडी इको, तणाव तपासणी व मुख्य शिबीराची नोंदणी केली जात आहे. तपासणीपासून शस्त्रक्रियेपर्यत एकाच ठिकाणी सर्वकाही सोय असल्याने नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. तिसऱ्या टप्प्यात रविवारी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत जगविख्यात डॉक्टरांचा सल्ला, तपासणी, औषधोपचार केले जाणार आहेत. ५ ऑगस्ट ते ५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत चौथ्या टप्प्यात शस्त्रक्रिया, उपचार यावर भर दिला आहे. डॉ. तात्यासाहेब लहाने, डॉ. वाकणकर, डॉ. गौतम भन्साळी, डॉ. रमाकांत देशपांडे, डॉ. के. एच संचेती, डॉ. विकास महात्मे, डॉ. यशराज पाटील, डॉ. अजय चंदनवाले, डॉ. संजयकुमार तांबे, डॉ. जगन्नाथ दिक्षीत, डॉ. अमित मायदेव, डॉ. अजय चौरसिया आदी तज्ज्ञ डॉक्टरांचा यामध्ये सहभाग आहे, असे सनी निम्हण यांनी नमूद केले. दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन माजी नगरसेवक दत्ता बहिरट, माजी उपमहापौर मुकारी अलगुडे, आदित्य माळवे, श्वेता चव्हाण, राजश्री काळे, सामाजिक कार्यकर्त्या मंगला पाटील, सुनील शिरोळे, शैलेश बडदे, इक्बाल शेख, अनिल बहिरट, सतिश चव्हाण, अतुल बहिरट आदी मान्यवरांच्या उपस्थितीत नुकतेच झाले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी शंकर चव्हण, अमित मुरकुटे, सचिन मानवतकर, सचिन इंगळे, अनिकेत कपोते, टिंकू दास, देवेंद्र देवकर, संतोष ओरसे, अभिषेक परदेशी, प्रमोद कांबळे, गणेश शेलार, गणेश शिंदे, ऋषीकेश मारणे, कृष्णा पटेल, बाळासाहेब सोरटे, कैलास पवार, कपिल शिंदे आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# पिस्तुलाच्या धाकाने हिंजवडीत भरदिवसा ज्वेलर्सवर दरोडा

पुणे । प्रतिनिधी

पिस्तूलाचा धाक दाखवून सराफाला मारहाण करीत चोरट्यांनी भरदिवसा ज्वेलर्सवर दरोडा घातला. ही घटना शुक्रवारी (दि. २) सकाळी लक्ष्मी चौक, हिंजवडी येथे घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लक्ष्मी चौक येथे शिवमुद्रा नावाने ज्वेलर्सचे दुकान आहे. शुक्रवारी सकाळी दुकान उघडल्यानंतर काही वेळातच चोरटे दुकानात घुसले. पिस्तुलाचा धाक दाखवत सराफाला मारहाण केली. त्यानंतर किंमती ऐवज चोरून नेल्याची माहिती मिळत आहे. घटनेची माहिती मिळताच वरीष्ठ अधिकारी हिंजवडीत (कळपक्षरुरवळ) दाखल झाले. शहरात नाकाबंदी लावण्यात आली आहे. घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.